दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले | RNI No. MAHMAR/2019/82605 | वर्ष ७ वे | पाने ८ | मुल्य रू. ४.०० | अंक ३२३ | रविवार ६ सप्टेंबर २०२६
| पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 | www.rashtrasahyadri.com

## महत्त्वाचे..

### दहीहंडी संपल्यावर डोक्यात रॉड पडला; महिलेचा मृत्यू

**पुणे :** राज्यात सर्वत्र दहीहंडी जल्लोषात साजरी होत असताना पुण्यातील जुन्या सांगवी भागात एक दुर्दैवी घटना घडली. दहीहंडीचा उत्सव संपल्यानंतर मंडपाचा लोखंडी सांगाडा उतरवताना झालेल्या अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला. जुन्या सांगवीतील लेन क्रमांक २ येथे ही घटना घडली. सलमा सलाउद्दीन पठाण (वय ४५ ) असे मृत महिलेचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दहीहंडीचा कार्यक्रम रात्री दहाच्या सुमारास पार पडला. त्यानंतर मंडप आणि कमानीचे लोखंडी स्ट्रक्चर काढण्याचे काम सुरू करण्यात आले. याचवेळी सलमा पठाण आणि त्यांचे पती सलाउद्दीन पठाण तेथून घरी जात होते. मंडपाची कमान उतरवली जात असताना लोखंडी रॉड अचानक खाली पडला आणि सलमा यांच्या डोक्यावर आदळला.या अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने औंध रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

# तातडीने गाळप हंगाम सुरु करा

## साखर उद्योगासमोर नवे आव्हान; अनुदानाशिवाय हंगाम लवकर सुरू करण्यास कारखानदारांचा नकार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** देशात मागणीपेक्षा साखरेचा अंदाजे ३० ते ४० लाख टन अतिरिक्त साठा असतानाही साखरेचे दर वाढल्याने केंद्र सरकारच्या अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालयाची चांगलीच धावपळ सुरू झाली आहे. साखरेचे दर नियंत्रणात आणण्यासाठी आता महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि कर्नाटक या प्रमुख साखर उत्पादक राज्यांवर २०२६-२७ चा ऊस गाळप हंगाम लवकर सुरू करण्यासाठी केंद्राकडून दबाव आणला जात आहे. मात्र, लवकर गाळपामुळे होणारे आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी विशेष अनुदान द्यावे, अशी भूमिका साखर कारखानदारांनी घेतली आहे.

देशातील साखरेचे एक्स-मिल दर काही काळात प्रतिकिलो ६८ रुपयांपर्यंत पोहोचले होते. किरकोळ बाजारात दर ८० रुपयांवर गेल्यानंतर केंद्राने दर नियंत्रणासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या. त्यानंतर एक्स-मिल दर सुमारे ४१ रुपयांपर्यंत खाली आला असला, तरी केंद्राला हा दरही अपेक्षेपेक्षा अधिक वाटत आहे.

गेल्या हंगामात देशात सुमारे २८० लाख टन साखरेचे उत्पादन झाले. यापूर्वीचा साठा सुमारे ५० लाख टन होता. देशांतर्गत वार्षिक खपही सुमारे २८० लाख टन गृहीत धरल्यास ३० सप्टेंबरपर्यंत जवळपास ३५ लाख टन साखर शिल्लक राहण्याचा अंदाज आहे. मात्र, हा साठा संपण्यापूर्वी बाजारात नव्या हंगामातील साखर उपलब्ध व्हावी, यासाठी केंद्राकडून गाळप लवकर सुरू करण्याचा प्रयत्न केला जात आहे.देशातील एकूण साखर उत्पादनापैकी सुमारे ८० टक्के उत्पादन महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि कर्नाटक या तीन राज्यांत होते. महाराष्ट्राचा वाटा सुमारे ३३ टक्के असून, त्यामुळे अहिल्यानगरसारख्या प्रमुख साखर उत्पादक जिल्ह्यांवर केंद्राच्या निर्णयाचा थेट परिणाम होणार आहे.

केंद्रीय अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालयाचे सचिव संजीव चोप्रा यांनी ८ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत साखर उद्योगाची बैठक बोलावली आहे. या बैठकीस संबंधित तीन राज्यांच्या सचिवांना निमंत्रित करण्यात आले आहे. ऑक्टोबरच्या मध्यापासून गाळप सुरू करण्याचा केंद्राचा आग्रह असल्याचे साखर उद्योगातील सूत्रांनी सांगितले. **(पान ४ वर)**

## साखर दरवाढ : कारखान्यांवर केंद्र सरकारच्या दबाव

### कारखाने आणि शेतकऱ्यांना नुकसान

केंद्राच्या आग्रहानुसार ऑक्टोबरमध्ये गाळप सुरू केल्यास कारखान्यांना सुमारे दीड टक्का साखर उतारा कमी मिळण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनाही उसाच्या वजनात १० ते १५ टक्क्यांपर्यंत घट सहन करावी लागू शकते. त्यामुळे लवकर गाळपासाठी कारखान्यांना प्रतिटन ५०० आणि शेतकऱ्यांना प्रतिटन ३०० रुपये विशेष अनुदान देण्याची मागणी करण्यात आली आहे.

### साखर बाजारावर केंद्राची करडी नजर

साखरेचे दर नियंत्रणात आणण्यासाठी केंद्राने दहा लाख टन कच्ची साखर आयातीला मंजुरी दिली; मात्र आठ लाख टनांसाठीच अर्ज आले. उर्वरित कोटा पूर्ण करण्यासाठी पुन्हा अर्ज मागविले आहेत. व्यापाऱ्यांची साठवणूक मर्यादा ४०० वरून २०० टन करण्यात आली असून, कारखान्यांच्या व्यापारी विक्रीचे तपशीलही केंद्राकडून तपासले जात आहेत.

# ‘ओबीसींच्या हक्काला धक्का लागणार नाही’

## शिंदे समितीचा मराठवाड्यात दौरा सुरू : विखे पाटील

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



■ ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्या भूमिकेवर बोलताना विखे पाटील यांनी ओबीसींच्या हक्काला कोणताही धक्का लागणार नसल्याचे सांगितले. अन्य कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता शासन कार्यवाही करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. शिंदे समितीचा मराठवाड्यात दौरा सुरू झाला असून त्यातून अनेक प्रश्न मार्गी लागतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.


**अहिल्यानगर :** मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचा आठवा दिवस सुरू असताना राज्यभरात मराठा समाजाच्या आंदोलनाला वेग आला आहे. विविध ठिकाणी रास्ता रोको, मंत्र्यांचे ताफे अडविणे अशा माध्यमातून सरकारचे लक्ष वेधले जात आहे. दरम्यान, सरकारकडूनही जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करून तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि उदय सामंत यांनी आंदोलनस्थळी भेट घेऊन जरांगे पाटील यांच्याशी चर्चा केली होती. मात्र, त्यांनी उपोषण सोडण्यास नकार दिला. या पार्श्वभूमीवर लोणी येथे बोलताना विखे पाटील म्हणाले की, सरकारने जरांगे पाटील यांच्या सर्व मागण्यांची दखल घेतली आहे. कायदेशीर बाबी तपासून कार्यवाही सुरू असून न्यायालयीन प्रक्रियेत निर्णय टिकावा, याची काळजी घेतली जात आहे. जरांगे पाटील यांनी उपचार घेण्यास नकार दिल्याने धक्का बसला असून त्यांनी असे पाऊल उचलू नये, असेही त्यांनी सांगितले. गरज पडल्यास अधिकारी व आपण पुन्हा त्यांची भेट घेऊ, असे विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, जात पडताळणी समितीवर दबाव आणू नये, अशी भूमिका छगन भुजबळ यांनी मांडली. काही आमदार जात प्रमाणपत्रातील त्रुटी दुरुस्त करण्याची भाषा करीत असल्याचा उल्लेख करत त्यांनी मुंबईतील नगरसेवकांची जात प्रमाणपत्रे रद्द झाल्याच्या प्रकरणाचा दाखला देत सरकारला सवाल केला.

## पुतीन यांचा कीव्हवरील हल्ल्यांना ७२ तासांचा ब्रेक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**मॉस्को :** रशिया-युक्रेन युद्ध थांबविण्याच्या राजनैतिक प्रयत्नांना वेग येण्याची चिन्हे दिसत असून, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादीमीर पुतीन यांनी कीव्हवरील हल्ले ७२ तासांसाठी थांबविण्याचे आदेश दिले आहेत. क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी शनिवारी या निर्णयाची माहिती दिली. ही तात्पुरती स्थगिती शनिवारी मध्यरात्रीपासून लागू होणार आहे.

या महत्त्वपूर्ण घडामोडीच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि जेरेड कुशनर हे शनिवारी मॉस्कोमध्ये दाखल झाले आहेत. रशिया-युक्रेनमधील युद्ध थांबविण्यासाठी रखडलेल्या शांतता चर्चेला पुन्हा गती देणे, हा त्यांच्या दौऱ्याचा प्रमुख उद्देश आहे. दोन्ही अमेरिकी प्रतिनिधी रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांच्याशी चर्चा करणार असून, त्यानंतर ते युक्रेनची राजधानी कीव्ह येथे जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

त्यामुळे दोन्ही देशांच्या राजधानींवरील हल्ल्यांना तात्पुरती स्थगिती देण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. रशिया आणि युक्रेनमध्ये गेल्या काही काळापासून हवाई हल्ल्यांची तीव्रता वाढली आहे. अशा परिस्थितीत अमेरिकेच्या मध्यस्थीने पुन्हा एकदा शांतता चर्चेचे प्रयत्न सुरू झाले आहेत. मात्र, दोन्ही देशांमधील प्रादेशिक आणि राजकीय मुद्द्यांवर अद्याप मोठे मतभेद कायम असल्याने ही ७२ तासांची स्थगिती दीर्घकालीन युद्धविरामात रूपांतरित होते का, याकडे जगाचे लक्ष लागले आहे.

# पाच लाख घेतले, आता मुलांच्या धर्मांतराची अट?

## स्थायी शिक्षकाच्या नोकरीचे आमिष; पाच जणांसह संस्थेविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** स्थायी शिक्षकाची नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून पाच लाख रुपये घेतल्यानंतरही शिक्षकाच्या दोन्ही मुलांचे धर्मांतर करण्यासाठी दबाव टाकल्याचा धक्कादायक आरोप समोर आला आहे. मुलांचे धर्मांतर करण्यास नकार दिल्याने स्थायी नोकरीची संधी नाकारल्याचा दावा शिक्षकाने वीरगाव पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत केला आहे. या तक्रारीवरून पोलिसांनी पाच जणांसह संबंधित संस्थेविरुद्ध गुन्हा दाखल केल्याने वैजापूर तालुक्यात खळबळ उडाली आहे.

फादर आशिष म्हस्के, सुदाम उबाळे, फादर जेरॉल्ड रिबेलो, संजय रुपेकर आणि विनोद शेळके अशी आरोपींची नावे आहेत. हा प्रकार बोरसर येथील शांती सदन प्राथमिक शाळेशी संबंधित असल्याचे तक्रारीत नमूद आहे. तक्रारदार बालासाहेब साठे व त्यांच्या पत्नी पूजा हे २०२४ मध्ये शाळेत शिक्षक म्हणून रुजू झाले. मात्र, लेखी नियुक्ती आदेश देण्यात आला नसल्याचे साठे यांनी म्हटले आहे. पुढे स्थायी नोकरीसाठी धर्मांतर अथवा मोठी रक्कम देण्याची अट घालण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यानंतर धार्मिक विधी करण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद आहे.रक्कम दिल्यानंतर त्यांच्या दोन्ही मुलांचे धर्मांतर करण्याची मागणी करण्यात आल्याचा आरोप आहे. त्यांनी नकार दिल्यानंतर नोकरी मिळणार नसल्याचे सांगण्यात आले. अखेर वीरगाव पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

■ **२०२६ मध्ये कायमस्वरूपी नियुक्तीसाठी पाच लाख रुपयांची मागणी करण्यात आली. शिक्षक भरतीची मंजुरी मिळवण्यासाठी ही रक्कम आवश्यक असल्याचे सांगण्यात आल्याचा दावा आहे. साठे यांनी विविध व्यक्तींकडून पैसे उधार घेऊन ४ जुलै रोजी ४ लाख ८० हजार, तर त्यानंतर २० हजार रुपये दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.**





## ऊस दरासाठी महाराष्ट्र-कर्नाटकातील शेतकरी एकवटणार

### २९ सप्टेंबरपासून हुबळीत बेमुदत धरणे; राजू शेट्टींची घोषणा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बेळगाव :** चालू गळीत हंगामात उच्चांकी ऊस दर मिळविण्यासाठी महाराष्ट्र आणि कर्नाटकातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी वज्रमूठ करण्याचे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते व माजी खासदार राजू शेट्टी यांनी केले.

केंद्र सरकारने साखरेचा किमान आधारभूत दर ५० रुपये किलो (५ हजार रुपये क्विंटल) करावा, तसेच इथेनॉलचा दर ७० रुपये प्रतिलिटर करावा, या मागण्यांसाठी दोन्ही राज्यांतील लाखो शेतकरी २९ सप्टेंबरपासून केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हुबळी येथील निवासस्थानाबाहेर बेमुदत धरणे आंदोलन करणार असल्याची घोषणा शेट्टी यांनी गुरलापूर येथे केली.

केंद्र सरकार आणि साखर कारखानदारांकडून साखर साठ्याची चुकीची आकडेवारी देऊन फसवणूक झाल्याचा आरोप शेट्टी यांनी केला. साखरेची टंचाई निर्माण झाल्याने १५ ऑक्टोबरपासून गळीत हंगाम सुरू करण्याची घाई केली जात आहे. मात्र, ऊस पूर्ण पक्व होण्यापूर्वी गाळप झाल्यास साखर उतारा घटून त्याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कर्नाटक राज्य रयत संघाचे अध्यक्ष चन्नाप्पा पुजारी यांनी गत हंगामातील तुटलेल्या उसाला प्रतिटन ३०० रुपयांचा दुसरा हप्ता तत्काळ देण्याची मागणी केली.


२९ सप्टेंबरपूर्वी महाराष्ट्र व कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांसह शेतकरी संघटनांची संयुक्त बैठक घ्यावी, अशी मागणीही करण्यात आली. ऊस दराचा सन्मानजनक तोडगा निघेपर्यंत दोन्ही राज्यांतील एकही साखर कारखाना सुरू करू देणार नाही, असा इशारा देण्यात आला.

## भैरवनाथ उपसा जलसिंचन सर्वेक्षणासाठी ८६.२४ लाखांची मान्यता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मिरजगाव :** कर्जत तालुक्यातील मिरजगाव आणि परिसर सुजलाम् सुफलाम् करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाकांक्षी असलेल्या भैरवनाथ उपसा जलसिंचन योजनेच्या सर्वेक्षणासाठी राज्य सरकारने ८६.२४ लाख रुपयांच्या निधीचा प्रशासकीय मान्यता दिली आहे.

या महत्वकांक्षी योजनेसाठी मिरजगावचे सरपंच नितिन खेतमाळस व भारतीय जनता पार्टीच्या सर्व पादाधिकाऱ्यांनी विधानपरिषदेचे सभापती ना.प्रा.राम शिंदे यांच्या माध्यमातून मुंबई येथे मंत्रालयात सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे.



मिरजगाव व परिसराकरिता महत्वकांक्षी असलेल्या भैरवनाथ उपसा जलसिंचन योजनेच्या सर्वेक्षणासाठी ₹८६.२४ लाखांची प्रशासकीय मान्यता मिळाली असून, परिसरातील क्षेत्रातील लागवडी योग्य ९० टक्के क्षेत्रापैकी मिरजगाव परिसरातून जाणाऱ्या सिना डावा कालवा लाभक्षेत्रात केवळ ४० टक्के लाभधारक शेतकरी येतात. उर्वरित शेतकऱ्यांची शेती केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते. पाऊस वेळेवर पडत नसल्याने या भागातील फळबागा व अन्य पिकांस मुबलक सिंचनाकरिता मुबलक पाणी उपलब्ध होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनावर परिणाम होऊन आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. प्रस्तावित भैरवनाथ उपसा जलसिंचन योजना मिरजगाव अंतर्गत एकूण १२ बंधारे भरणे प्रस्तावित असून सदर बंधाऱ्याद्वारे सिंचनासाठी सिना कालव्याचे पाणी सोडल्यास शेतकऱ्यांना रब्बी व उन्हाळी हंगामात ही सिंचन **(पान ४ वर)**

# मराठा आरक्षणासाठी राज्यभर आंदोलने

## मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा; सोलापुरात पडळकरांचा ताफा अडवला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या मागण्यांसह मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाबाबत सरकारने तातडीने भूमिका जाहीर करावी, अशी मागणी आंदोलकांकडून होत आहे. जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचा आज आठवा दिवस असून सरकारसोबत त्यांच्या प्रतिनिधींची बोलणी सुरू आहेत. त्यांच्या प्रकृतीची काळजी घेत मागण्या तातडीने मान्य कराव्यात, या मागणीसाठी राज्यभर आंदोलनाचे पडसाद उमटत आहेत.

सोलापूर-रत्नागिरी महामार्गावरील कामती येथे मराठा आंदोलकांनी भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांचा ताफा अडवला. यावेळी पडळकर यांनी मराठा समाजाच्या एसईबीसी व कुणबी आरक्षणाला आपला कायम पाठिंबा असल्याचे सांगितले. खाडाखोड केलेला कुणबी दाखला रद्दच होणार, अशी भूमिका काही त्यांनी स्पष्ट केली.

दरम्यान, नाशिक जिल्ह्यातील मनमाड येथे मराठा समाजाने पुणे-इंदूर महामार्गावर चक्काजाम आंदोलन केले. मोर्चा काढून आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत जरांगे पाटील यांना पाठिंबा दिला. आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.



नाशिक जिल्ह्यातील मनमाड येथे मराठा समाजाने पुणे-इंदूर महामार्गावर चक्काजाम आंदोलन केले.



सोलापूर-रत्नागिरी महामार्गावरील कामती येथे मराठा आंदोलकांनी भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांचा ताफा अडवला.

# डीजेच्या गोंगाटात शांतता अन् विद्यानंदाच्या बडबडीत मुद्दा हरवला...

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

महाराष्ट्रात सध्या गणेशोत्सवाचा उत्साह आहे. ढोल-ताशे वाजत आहेत, डीजे धडाडत आहेत, मिरवणुका निघत आहेत आणि त्याचवेळी एका वेगळ्याच आवाजाची महाराष्ट्रभर चर्चा सुरू आहे. हा आवाज डीजेचा नाही, तर विद्यानंद बापट यांच्या शब्दांचा आहे! परिणामी परिस्थिती अशी झाली आहे की डीजेच्या गोंगाटात शांतता हरवली आणि विद्यानंदाच्या बडबडीत मूळ मुद्दाच हरवला!

गणेशोत्सव म्हटला की जल्लोष आलाच. ढोल-ताशे, लेझीम, बँड, मिरवणुका हे महाराष्ट्राच्या उत्सवसंस्कृतीचे अविभाज्य घटक आहेत. पण उत्सवाचा आवाज कधी ध्वनीप्रदूषणाच्या सीमारेषा ओलांडतो, हा प्रश्न दरवर्षी उभा राहतो. यंदा हा प्रश्न पुण्यात विद्यानंद बापट यांनी अधिक आक्रमकपणे उपस्थित केला. डीजेच्या कर्णकर्कश आवाजाला विरोध केला आणि मग त्यांच्याभोवती वादळच निर्माण झाले.

प्रश्न उपस्थित करणे हा गुन्हा नाही. एखाद्याला डीजे आवडत नसेल, तर त्याला त्याविरोधात बोलण्याचा अधिकार आहे. दुसऱ्याला डीजे आवडत असेल, तर त्यालाही आपली भूमिका मांडण्याचा अधिकार आहे. लोकशाहीचे सौंदर्यच मतभेदात आहे. मात्र, मतभेदाला उत्तर विचारांनी न देता हाताने दिले गेले, तर प्रश्न डीजेचा राहत नाही; तो समाजाच्या सहनशीलतेचा बनतो. बापट यांना मारहाण झाली असेल, तर ती निश्चितच निषेधार्ह आहे. कारण आवाज कितीही मोठा असला तरी हात उचलण्याचा अधिकार कोणालाही मिळत नाही.

पण इथेच दुसरी गंमत सुरू होते. डीजेविरोधातील प्रश्न मांडताना विद्यानंद बापट यांच्या अस्खलित, संस्कृतप्रचुर आणि काही वेळा सामान्य माणसाच्या डोक्यावरून जाणाऱ्या मराठीने सोशल मीडियाला नवा विषय दिला. 'परान्मुख', 'न्यायोचित', 'दुराग्रह', 'खंडन', 'स्खलनस्वातंत्र्य' असे शब्द ऐकून अनेकांना मराठी भाषेतील शब्दकोश पुन्हा उघडावा लागला. 'घटं भिन्द्यात् पटं छिन्द्यात् कुर्याद् गर्दभरोहणम्...' या सुभाषिताने तर रील्सच्या जगाला नवा मसाला मिळाला.

मग बापट डीजेच्या आवाजाविरोधातील कार्यकर्ता कमी आणि 'व्हायरल कंटेंट' अधिक बनले! कुणी त्यांना 'लॉर्ड बापट' म्हटले, कुणी 'बापट उवाच' केले, कुणी त्यांच्या भाषेवर मीम केले, तर कुणी त्यांच्याकडून मराठीच्या शिकवण्या सुरू करण्याची मागणी केली. म्हणजे ध्वनीप्रदूषणाचा प्रश्न सुरू झाला आणि आपण शब्दप्रदूषणाच्या चर्चेत शिरलो! बापटांचे एक वाक्य मात्र विचार करण्यासारखे आहे. 'भाषा हे विचारांच्या देवाणघेवाणीचे साधन आहे, साध्य नाही'. अगदी बरोबर! मग प्रश्न उपस्थित होतो की, भाषेच्या सौंदर्यापेक्षा मुद्द्याचे गांभीर्य मोठे आहे की नाही?

एखाद्या सामाजिक प्रश्नावर बोलताना भाषा प्रभावी असावी, नेमकी असावी आणि समोरच्याला समजावी. शब्दांची श्रीमंती चांगलीच; पण शब्दांच्या फुलबाजीत मूळ प्रश्नाचा दिवा विझला तर उपयोग काय?

आज सोशल मीडियाने बापटांच्या भाषेला डोक्यावर घेतले आहे. त्यांच्या प्रत्येक वाक्याची रील, प्रत्येक शब्दाचा मीम आणि प्रत्येक सुभाषिताची नवी व्याख्या केली जात आहे. हे भाषेवरील प्रेम आहे की व्हायरल होण्याची भूक, याचे उत्तर प्रत्येकाने आपापल्या मनात शोधावे.

मुळात प्रश्न 'डीजे हवा की नको?' एवढाच नाही. प्रश्न आहे तो किती आवाज, किती वेळ आणि कोणासाठी?

गणेशोत्सव साजरा करणाऱ्यांचा उत्साह योग्यच. पण त्याच वेळी घरात आजारी माणूस, परीक्षा देणारा विद्यार्थी, वृद्ध व्यक्ती, लहान मूल किंवा रात्री काम करणारा कर्मचारीही या समाजाचाच भाग आहे. त्यांचा शांततेचा अधिकार कुठे संपतो आणि उत्सवाचा अधिकार कुठे सुरू होतो, याचे संतुलन प्रशासनाने ठरवले पाहिजे.

'आमचा सण, आमचा आवाज' ही भूमिका जितकी चुकीची, तितकीच 'सण आहे म्हणून आवाजच नको' ही भूमिका अव्यवहार्य. नियम हवेत; पण ते सर्वांसाठी समान हवेत. हिंदूंचा सण असो, मुस्लिमांचा, ख्रिश्चनांचा किंवा अन्य कोणत्याही समाजाचा कार्यक्रम, ध्वनीप्रदूषणाचे मापदंड धर्म पाहून बदलता कामा नयेत.

या वादाला आता संगीताचीही फोडणी मिळाली. गायक अवधूत गुप्ते यांनी बापट यांच्या समर्थनार्थ गाणे तयार केले. गाणे आले आणि सोशल मीडियावर पुन्हा जल्लोष झाला. म्हणजे पुण्यात डीजे वाजत होता, त्याला विरोध करण्यासाठी बापट बोलत होते, बापटांच्या बोलण्यावर सोशल मीडिया नाचत होता आणि त्यावर अवधूत गाणे गात होते!

या सगळ्या गदारोळात मात्र एक साधा प्रश्न एका कोपऱ्यात उभा आहे, ध्वनीप्रदूषणाचे काय? तो प्रश्न अजूनही तिथेच आहे. मुद्दा कुठे हरवला?

बापटांची भूमिका योग्य की अयोग्य, यावर चर्चा होऊ शकते. डीजेचा आवाज किती असावा, मिरवणुकीची वेळ काय असावी, नियमांचे पालन कोण करणार, उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई कोण करणार? या प्रश्नांवर गंभीर चर्चा होणे गरजेचे आहे. पण आपण काय करतोय? डीजेच्या आवाजावरून भांडतोय.

बापटांच्या भाषेवर हसतोय. त्यांच्या सुभाषितांवर रील्स बनवतोय. त्यांच्यावर गाणे बनवतोय. मारहाणीवर राजकारण करतोय. आणि मूळ प्रश्न मात्र आहे तेथेच पडून आलो राहतो.

हीच आपल्या सार्वजनिक चर्चेची शोकांतिका आहे. आज सोशल मीडिया कोणालाही एका रात्रीत प्रसिद्ध करू शकतो. पण प्रसिद्धी आणि प्रश्नाचे निराकरण यात जमीन-अस्मानाचा फरक आहे.

एखादा माणूस शंभर संस्कृत सुभाषिते सांगू शकतो; दुसरा शंभर डेसिबलचा डीजे वाजवू शकतो. पण समाजाला शेवटी हवे आहे ते ना सुभाषित, ना गोंगाट... हवे आहे समतोल उत्तर!

उत्सवही हवा आणि शांतताही हवी. श्रद्धाही हवी आणि शिस्तही हवी. अभिव्यक्तीचे स्वातंत्र्यही हवे आणि दुसऱ्याच्या अधिकाराचा आदरही हवा. आणि म्हणूनच सबंध महाराष्ट्राने आता विचार करायला हवा. डीजेच्या गोंगाटात शांतता अन् विद्यानंदाच्या बडबडीत मुद्दा हरवायला नको.

आता डीजेचा आवाज कमी करायचा की नाही, हे प्रशासनाने ठरवावे. विद्यानंदांनी बडबड कमी करायची की नाही, हे त्यांनी ठरवावे. पण समाजाने मुद्दा हरवू द्यायचा की नाही, हे मात्र आपण सगळ्यांनी ठरवले पाहिजे!

# प्रवरासंगम येथे कबड्डी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील टोका-प्रवरासंगम येथे जय मल्हार मित्र मंडळाच्या वतीने गोकुळाष्टमी दहीहंडी उत्सवाच्या निमित्ताने ग्रामीण भागातील खेळाडूंना वाव देण्यासाठी आयोजित कबड्डी स्पर्धे ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेचे उद्घाटन महंत सुनीलगिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.



प्रवरासंगम येथील श्री सिद्धेश्वर हायस्कूलच्या प्रांगणात माजी मंत्री शंकरराव गडाख मित्र मंडळाच्या खंबीर साथीने व युवा नेते उदयन गडाख यांच्या प्रेरणेने सदरच्या कबड्डी स्पर्धा भरविण्यात आल्या होत्या.

या स्पर्धेचे उद्घाटन श्रीराम साधना आश्रमाचे महंत सुनीलगिरी महाराज यांच्या हस्ते व पोलीस निरीक्षक प्रताप दराडे,मुळा कारखान्याचे व्हाईस चेअरमन बाळासाहेब पाटील,प्रवरासंगमचे माजी उपसरपंच सुनीलराव बाकलीवाल, नेवासा प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष पत्रकार सुधीर चव्हाण, गो-सेवक परवेज पठाण, आयोजक शांतवन खंडागळे, सोमनाथ साठे यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना महंत सुनीलगिरी महाराज म्हणाले की जय मल्हार मित्र मंडळाने आयोजित केलेल्या कबड्डी स्पर्धेमुळे ग्रामिण भागातील खेळाडूंना निश्चितच ऊर्जा मिळणार आहे,मोबाईलमध्ये गुंतलेल्या भावी पिढीने त्यातून बाहेर पडून मैदानी खेळाकडे वळावे असे आवाहन केले.

यावेळी उपस्थित खेळाडूंना मार्गदर्शन करतांना नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे म्हणाले की ग्रामीण भागातील खेळाडू मधूनच खरे देशासाठी लढणारे खेळाडू तयार होत असतात,मोठे ध्येय व उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन तुम्ही बिनधास्त खेळा,आम्ही गुन्हेगारांशी कबड्डी खेळायला सक्षम आहोत,चांगले शरीर कमवा,व्यसनांपासून दूर रहा,खेळाच्या माध्यमातून देशाचे नाव उज्वल करा असे आवाहन त्यांनी युवा खेळाडूंना केले.

कबड्डी स्पर्धेच्या शुभारंभ प्रसंगी टोका सरपंच बापू डावखर,माजी सरपंच कडूबाळ रासने,अरुण पवार, नवनाथ चाबुकस्वार, संतोष मोरे,काका खंडागळे,दिलीप खंडागळे, राहुल खंडागळे यांच्यासह खेळाडू व प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कुणाल माळी व अर्जुन जाधव यांनी पंच म्हणून काम पाहिले. नेवासाफाटा व प्रवरासंगम संघामध्ये लढत झाली.

# गोदावरी डाव्या कालव्यातून पाणी उचलण्यास मंजुरीसाठी पाठपुरावा

## पूर्व भागातील पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी आ. आशुतोष काळे प्रयत्नशील

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्याच्या पूर्व भागातील गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी गोदावरी डाव्या कालव्यातून ओव्हरफ्लोच्या काळात उपसा सिंचनाद्वारे पाणी उचलण्यास मंजुरी मिळावी, यासाठी पाठपुरावा सुरू असल्याची माहिती आमदार आशुतोष काळे यांनी दिली.

पूर्व भागातील तिळवणी, आपेगाव, गोधेगाव, शिरसगाव, सावळगाव, उक्कडगाव, कासली व पढेगाव आदी गावांतील विकासकामांचा आढावा, भूमिपूजन व लोकार्पण तसेच तिळवणी येथील पालखेड डाव्या कालव्यातून पाझर तलावात सोडलेल्या पाण्याचे जलपूजन काळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

काळे म्हणाले, मागील सात वर्षांत पूर्व भागातील रस्ते, पूल व विविध विकासकामांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. शिरसगाव-तिळवणीदरम्यान कोळ नदीवरील पुलामुळे दळणवळणाचा प्रश्न सुटला आहे. मात्र, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अद्याप महत्त्वाचा असून तो कायमस्वरूपी सोडविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

गोदावरी डाव्या कालव्यातून ओव्हरफ्लोच्या काळात पाणी उचलण्याच्या मागणीला जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. जलसंपदा विभागाचे सर्वेक्षण जवळपास पूर्ण झाले असून पाणी उचलण्यासाठी आवश्यक नियोजनाचा अहवाल सादर झाल्यानंतर मंजुरी मिळविण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे काळे यांनी सांगितले.



दरम्यान, तिळवणी येथील जलजीवन मिशनच्या पाण्याच्या टाकीची व २५ लाखांच्या तलाठी कार्यालयाच्या इमारतीची पाहणी करून काम दर्जेदार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच शिरसगाव-गोधेगाव रस्ता ते शेखवस्ती खडीकरणाच्या १० लाखांच्या कामाचे भूमिपूजन आणि आपेगाव येथील सात लाखांच्या निधीतून उभारलेल्या बंदिस्त जिमचे लोकार्पण करण्यात आले.

# पुणतांब्यात शिवसेनेची गटवार पदाधिकारी नियुक्ती; पक्षबांधणीला जोर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने पुणतांबा जिल्हा परिषद गटातील शिवसेना संघटन मजबूत करण्यासाठी गटवार पदाधिकारी नियुक्ती व मार्गदर्शन बैठकीचे आयोजन करण्यात आले. शहरप्रमुख महेश कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कार्यक्रमात शिवसेना तसेच युवासेना, शिक्षक सेना, वाहतूक सेना आणि रिक्षा सेनेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

यावेळी जिल्हा संपर्कप्रमुख आमदार सुनीलभाई शिंदे, कोपरगाव विधानसभा संपर्कप्रमुख आशुतोष मार्तंडे, जिल्हाप्रमुख सचिन कोते, सहसंपर्कप्रमुख प्रमोद लबडे, कोपरगाव तालुकाप्रमुख भरत मोरे, राजाभाऊ शेख, राहाता तालुकाप्रमुख बाबासाहेब चौधरी आदी उपस्थित होते.

बैठकीत शिवसेनेच्या संघटनात्मक वाटचालीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. संपर्कप्रमुख आशुतोष मार्तंडे यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देत पक्षवाढीसाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाला आगामी काळात अधिक बळ देण्यासाठी पुणतांबा शहर शिवसेनेच्या पाठीशी वरिष्ठ पदाधिकारी ठामपणे उभे राहतील, असे त्यांनी सांगितले.

शहरप्रमुख महेश कुलकर्णी यांनी आपल्या मनोगतात आपण लहानपणापासून शिवसेनेशी निष्ठेने जोडलेलो असल्याचे सांगत पक्षाशी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या शिवसैनिकांचे महत्त्व अधोरेखित केले. केवळ वाहनावर पक्षाचे स्टिकर लावून फिरणे म्हणजे शिवसैनिक नव्हे, तर पक्षवाढीसाठी निष्ठेने योगदान देणे आवश्यक असल्ज्ञयाचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी ज्येष्ठ शिवसैनिक शंकरराव शेलार, दत्तात्रय बोर्डे, यशवंत ठुबे, अर्जुन फल्ले, सिताराम भुसाळ, बाळासाहेब सांबारे, भाऊसाहेब साळुंके, प्रकाश देशमाने, डॅनियल पारधे यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

विविध पदांवर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास पुणतांबा शहरातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री क्षेत्र निझर्णेश्वर परिसरात दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये वाढ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी |** श्रावण मासानिमित्त भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री क्षेत्र निझर्णेश्वर महादेव मंदिर परिसरात चोरट्यांचा सुळसुळाट झाला आहे. शिवभक्तांच्या गर्दीचा गैरफायदा घेत अज्ञात चोरट्यांनी मागील काही दिवसांत तीन दुचाकी पळवल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

> भाविकांच्या गर्दीचा गैरफायदा घेऊन दुचाकी चोरीच्या घटना घडत आहेत. श्रावणी सोमवारी वनविभागाकडून पार्किंग व्यवस्था पाहिली जाते; मात्र इतर दिवशी मंदिरालगतच्या वनविभागाच्या जागेवर कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसल्याने चोरट्यांचे फावले आहे. या गंभीर प्रकाराबाबत लवकरच पोलीस प्रशासन आणि वनविभागाला निवेदन देऊन नियमित गस्त व चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी करणार आहोत.
>
> **- बाळासाहेब जोंधळे**
> **(विश्वस्त तथा खजिनदार, निझर्णेश्वर देवस्थान)**

कोकणगाव-शिवापूर (ता. संगमनेर) शिवारातील निझर्णेश्वर महादेव मंदिरात श्रावण महिन्यात पंचक्रोशीसह जिल्हाभरातून शिवभक्त दर्शनासाठी मोठी गर्दी करतात. श्रावणी सोमवार वगळता इतर दिवशीही भाविकांची दैनंदिन मोठी वर्दळ असते. मात्र, याच गर्दीचा गैरफायदा अज्ञात चोरट्यांनी उचलला असून मंदिरालगत असलेल्या वनविभागाच्या मोकळ्या जागेत भाविकांनी लावलेल्या दुचाकींवर चोरट्यांनी डल्ला मारला आहे.

यात चोरीस गेलेल्या वाहनांमध्ये शिबलापूर, कोकणगाव आणि मनोली येथील भाविकांच्या दुचाकीचा समावेश आहे. या घटनांबाबत पोलिसांत अद्याप अधिकृत गुन्हा दाखल झाला आहे किंवा नाही याबाबत स्पष्टता नसली, तरी भाविकांमध्ये वाहनांच्या सुरक्षेविषयी मोठी भीती निर्माण झाली आहे.

दरम्यान, या वाढत्या घटनांची गंभीर दखल घेत निझर्णेश्वर देवस्थान विश्वस्त मंडळाने चोरट्यांचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे; तसेच दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनीही सतर्क राहून वाहने सुरक्षित लावण्याचे आवाहन केले आहे.

# त्रिमूर्ती कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** त्रिमूर्ती कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, त्रिमूर्तीनगर, नेवासा फाटा येथे शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य निकिता बर्गे उपस्थित होत्या. तसेच कला विभागाचे विभागप्रमुख प्रा. संतोष जावळे,आय क्यू ए सी विभागाचे प्रमुख डॉ. दशरथ रोडे,प्रा.गोरख गुंड, प्रा. सोमनाथ खेडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.विद्यार्थ्यांनी शिक्षक बनून अध्यापनचे कामकाज शिक्षक दिनानिमित्त केले





यावेळी शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या विविध जबाबदाऱ्यांचा अनुभव मिळावा या उद्देशाने विद्यार्थिनी गौरी विधाटे यांनी प्राचार्यपदाची, तर विद्यार्थिनी कल्याणी वरखडे यांनी उपप्राचार्यपदाची भूमिका यशस्वीपणे पार पाडली. विद्यार्थिनींनी या जबाबदाऱ्या उत्साहाने स्वीकारून आपल्या नेतृत्वगुणांचे दर्शन घडविले.

कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती असलेला आदर, कृतज्ञता आणि प्रेम व्यक्त करत मनोगते सादर केली. विद्यार्थ्यांच्या मनोगतातून शिक्षकांनी त्यांच्या जीवनात दिलेले मार्गदर्शन, संस्कार आणि प्रेरणा यांचे महत्त्व अधोरेखित झाले.यानंतर उपस्थित शिक्षकांनीही आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच शिस्त, संस्कार, मेहनत आणि सकारात्मक दृष्टिकोन यांचे महत्त्व पटवून दिले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांचा सत्कार करून त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास कसा घडतो, याची जाणीव या कार्यक्रमातून झाली. संपूर्ण कार्यक्रम आनंदी, उत्साही आणि भावनिक वातावरणात पार पडला. विद्यार्थी व शिक्षकांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील स्नेहभाव अधिक दृढ करणारा हा कार्यक्रम अत्यंत सुंदर, आनंददायी आणि संस्मरणीय ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले. अशा उत्साहपूर्ण वातावरणात शिक्षक दिनाचा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

# मानवाच्या शाश्वत विकासासाठी पर्यावरण संवर्धन महत्त्वाचे- डॉ. गोरक्ष ससाणे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** मानवाच्या शाश्वत विकासासाठी पर्यावरणाचे महत्त्व मोठे आहे. त्यासाठी पर्यावरण समृद्ध असणे गरजेचे असून प्रत्येकाने एक तरी झाड लावून त्याचे जतन करणे आवश्यक आहे. एक झाड लावणे म्हणजे एक भविष्य घडवणे होय असे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी केले. बुऱ्हाणनगर ता. जि. अहिल्यानगर येथील संकल्प अकॅडमी आणि रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर इंटिग्रिटी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आणि निलंगी गडाख संचालिका, संकल्प अकॅडमी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी वृक्षारोपण झाल्यानंतर प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना डॉ. गोरक्ष ससाणे बोलत होते. याप्रसंगी मुळा एज्युकेशन सोसायटीचे शैक्षणिक प्रमुख व एच. आर. संदीप खेडकर, रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर इंटिग्रिटीचे अध्यक्ष रोटेरियन सईद शेख, रोटरी क्लबच्या सदस्या अॅड. ज्योत्स्ना ससाणे व संकल्प अकॅडमीच्या प्राचार्या श्रीमती विना मुंगी उपस्थित होत्या.संदीप खेडकर यांनी विद्यार्थी व मान्यवरांना वृक्षारोपणाचे महत्त्व समजावून सांगितले. यानंतर उपस्थित सर्वांनी पर्यावरण संरक्षणाची प्रतिज्ञा घेतली. यावेळी प्रमुख पाहुणे आणि विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका मुबीना शेख यांनी तर आभार विना मुंगी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी संकल्प अकॅडमीतील विद्यार्थी व शिक्षक तसेच रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# टाकळीभान टेल टँक परिसर पर्यटनस्थळ व्हावा : अविनाश आदिक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान (प्रतिनिधी) :** गोविंद सागर परिसराचे सुशोभीकरण करून येथे बोटिंगची सुविधा उपलब्ध करावी आणि या परिसराचा पर्यटनस्थळ म्हणून विकास करावा, अशी अपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव अविनाश आदिक यांनी व्यक्त केली.



टाकळीभान येथील गोविंद सागरच्या जलपूजनानंतर कार्यकर्त्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी माजी आमदार लहू कानडे, श्रीरामपूरच्या माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक, राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य सरचिटणीस अरुण पाटील नाईक यांच्यासह गावातील पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

आदिक म्हणाले, गोविंद सागर हा परिसरातील शेतकऱ्यांसाठी जीवनदायी ठरला आहे. हा तलाव पूर्ण क्षमतेने भरल्यास शेतकऱ्यांना मोठा फायदा होतो. त्यामुळे टेल टँकच्या दुरुस्तीची कामे तातडीने करण्यात यावीत. तसेच पर्यटन विकासासाठी पाटबंधारे विभागाने सुशोभीकरण व बोटिंग सुविधेचा प्रस्ताव तयार करावा. याबाबत संबंधित मंत्री आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

माजी आमदार लहू कानडे यांनी स्व. गोविंदराव आदिक यांच्या दूरदृष्टीतून गोविंद सागरची निर्मिती झाल्याचे सांगत, भविष्यातील अडचणी सोडविण्यासाठी आपण सदैव प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही दिली.

दरम्यान, अविनाश आदिक, लहू कानडे, अनुराधा आदिक, अरुण पाटील नाईक तसेच पत्रकारांच्या हस्ते गोविंद सागरचे जलपूजन करण्यात आले. यावेळी ग्रामस्थ, पदाधिकारी व पाटबंधारे विभागाचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेवासा परिसरातील बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करा,

## माळवदे यांचा आंदोलनाचा इशारा



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा व आसपासच्या गावाच्या परिसरातील बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करा अन्यथा अहिल्यानगर वनविभाग कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा ईशारा काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी वनपरीक्षेत्र अधिकाऱ्यांना दिला. नेवासा ते उस्थळ दुमाला या दरम्यान असणाऱ्या गायके वस्ती जवळ अनेक शेतकऱ्यांनी बिबट्याच्या नर व मादीस बघितले असून या बिबट्यानी या परिसरात पाळीव जनावरावर हल्ला देखील केला आहे यात येथील शेकऱ्यांच्या शेळ्या व मेंढ्याना देखील बिबट्यानी भक्ष बनविले आहे. तसेच देशपांडे फार्म जवळ शेतकऱ्यांवर हल्ला केला आहे. यामुळे या परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतीचे कामे ठप्प झाली आहे.

शेती मशागतीला येण्यास मजूर नकार देत आहे. तर रात्रीची वीज असल्यामुळे शेतकऱ्यांना पिकांना पाणी देणे मुश्किल झाले आहे. यातच पाटपाण्याच आवर्तन आल्याने पाणी कस द्यायच हा प्रश्न निर्माण झाला आहे. नरभक्षक बिबट्या व मादी असल्यामुळे जनतेच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.

शेतकऱ्यांच्या या प्रश्नांची दखल घेत काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी अहिल्यानगर येथील वनपरीक्षेत्र अधिकाऱ्यांची भेट घेऊन बिबट्यांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी केली. तातडीने पिंजरा न बसविल्यास अहिल्यानगर येथील कार्यालयासमोर धरणे आंदोलनाचा ईशारा दिला.यावेळी वनपरीक्षेत्र अधिकारी यांनी तातडीने पिंजरा बसविण्यात येईल व नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे करण्यात येईल असे आश्वासन दिले. यावेळी काँग्रेसचे अजूम पटेल व शेतकरी उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# कर्जत तालुक्यातील ९२ ग्रामपंचायतीपैकी तब्बल ७५ ग्रामपंचायत विना कारभारी!

## २३ ऑगस्टपासून प्रशासक गैरहजर; नागरी सुविधेसह गाव कारभाराची ऐसीतैशी

**डॉ अफरोजखान पठाण। राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** जवळपास एक पंचवार्षिक संपत आली तरी जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गण विना लोकप्रतिनिधी विकासकामापासून वंचित राहिले आहे. तीच भर कर्जत तालुक्यातील एकूण ९२ ग्रामपंचायतीपैकी जवळपास ७५ ग्रामपंचायतीची झाली आहे. ७५ ग्रामपंचायतीवर प्रशासक राज असून २३ ऑगस्टला ती देखील मुदत संपली असून विना लोकप्रतिनिधी आणि विना प्रशासक अशी गत स्थानिक स्वराज्य संस्थेची झाली. ही लोकशाहीची पायमल्ली नाही का ? असा सवाल सर्वसामान्य नागरिकांसह राजकीय पदाधिकारी देखील उपस्थित करीत आहे.

**कर्जत तालुक्यातील या १७ ग्रामपंचायतीवर सरपंच आणि राजकीय बॉडी अस्तित्वात – सुर्यवंशी**

कर्जत तालुक्यातील एकूण ९२ ग्रामपंचायतीपैकी अवघ्या १७ च ग्रामपंचायतीवर सरपंच नियुक्त आहे. त्या ग्रामपंचायतीची नावे पुढीलप्रमाणे : अळसुंदे, कापरेवाडी म्हाळगी, मुळेवाडी, बहिरोबावाडी, निंबे, कौडाने, कोपर्डी, बजरंगवाडी, कोरेगाव, कुळधरण, खेड, औटेवाडी, गणेशवाडी, वायसेवाडी, करमणवाडी आणि कुंभेफळ

२०२२ साली जिल्हा परिषद सदस्य आणि पंचायत समिती सदस्यांची मुदत संपली आहे. जवळपास एक पंचवार्षिक होत आली तरी स्थानिक स्वराज्याची मिनी आमदारकी निवडणूक प्रलंबित राहिल्याने गावपातळीवरचा विकास खुंटला आहे. मात्र यावर उचित कार्यवाही होताना दिसत नाही. तोच कित्ता कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये देखील दिसत आहे. कर्जत तालुक्यात एकूण ९२ ग्रामपंचायती अस्तित्वात असून यापैकी अवघ्या १७ ग्रामपंचायतीची अधिकृत राजकीय पदाधिकाऱ्यांची बॉडी नियमानुसार कार्यान्वित आहे. तर तब्बल ७५ ग्रामपंचायतीवर प्रशासक नियुक्ती आहे. आता तर २३ ऑगस्टपासून वरील ग्रामपंचायत देखील विना कारभारी टाळेबंद अवस्थेत पडल्याने गावपातळीवरच्या विकासाचे काय ? असा सवाल सर्वसामान्य नागरिकांसह राजकीय पदाधिकाऱ्यांना पडला आहे. राजकीय आरक्षणात २०२४-२५ साली २१ ग्रामपंचायतीवर अधिकारी प्रशासक नियुक्त होते.

मात्र त्यात फेब्रुवारी २०२६ ला आणखी ५४ ग्रामपंचायतीची भर पडली. शासनाच्या नवीन आदेशानुसार ५४ ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंचानाच प्रशासक म्हणून ६ महिन्यासाठी मुदतवाढ देत नियुक्ती देण्यात आली होती. मात्र २३ ऑगस्टला त्याचा देखील अवधी संपला आहे. विना कारभारी कर्जत तालुक्यातील ५ जिल्हा परिषद गट, १० पंचायत समिती गण आणि तब्बल ७५ ग्रामपंचायतीच्या मतदारांसह गावपातळीवरचा विकास खुंटला आहे. सर्वसामान्य जनतेच्या सुविधेची ऐसी-तैशी घडली आहे. नागरिक देखील शासनाच्या विविध योजनेपासून वंचित राहत असून गरजवंतना न्याय मिळणे कठीण झाले आहे. त्यामुळे पुन्हा नवीन प्रशासकास वाढीव काळ मिळणार की ? रखडलेल्या निवडणुका पार पाडणार याकडे लक्ष लागले आहे.

कर्जत तालुक्यातील तब्बल ७५ ग्रामपंचायतीवर प्रशासक राज असून यामुळे गावाचा विकास थांबला असून सर्वसामान्य नागरिक सुविधेपासून वंचित राहण्याच्या घटना घडत आहे. वास्तविक पाहता २०२४-२५ ला बेनवडी, कोळवडी, जळकेवाडी, खातगाव, लोणी-मसदपूर, माही, निंबोडी, सितपुर, शिंदे, नवसरवाडी, जळगाव, बिटकेवाडी, राशीन, काळेवाडी, सोनाळवाडी, देशमुखवाडी, कानगुडवाडी, परिटवाडी, आंबिजळगाव, तोरकडवाडी आणि घुमरी या २१ गावांचा समावेश होता. तर फेब्रुवारी २०२६ ला यात आणखी ५४ ग्रामपंचायतीची भर पडली आहे.

# राधा-कृष्णाच्या वेशभूषेत बालगोपालांचा जल्लोष

## गीतांच्या तालावर दहीहंडी फोडत विद्यार्थ्यांनी लुटला आनंद



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी शहर :** एकलव्य शिक्षण संस्थेच्या मा. बबनराव ढाकणे प्राथमिक शाळेत दहीहंडी उत्सव उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, राधा-कृष्णाची वेशभूषा आणि गीतांच्या तालावर रंगलेला दहीहंडी सोहळा यामुळे शाळेचा परिसर कृष्णमय झाला होता.

दहीहंडी उत्सवानिमित्त विद्यार्थ्यांनी राधा-कृष्णाची वेशभूषा धारण करून शाळेत उपस्थिती लावली. पारंपरिक वेशभूषेतील बालगोपालांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. गीतांच्या तालावर विद्यार्थ्यांनी उत्साहात दहीहंडी फोडली. हंडी फुटताच विद्यार्थ्यांनी जल्लोष करत आनंद व्यक्त केला. त्यानंतर विद्यार्थ्यांना लाह्यांचा प्रसाद वाटप करण्यात आला.

सण-उत्सवांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती आणि परंपरांची ओळख व्हावी, त्यांच्यात सांघिक भावना, एकोपा आणि संस्कार रुजावेत, तसेच विविध सांस्कृतिक उपक्रमांतून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शालेय जीवनात अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आनंदासोबतच सामूहिक सहभागाचे महत्त्वही अनुभवता येते.

कार्यक्रमास शिक्षिका ऋतुजा दसपुते, श्रद्धा चट, सारिका गोरे, शिक्षक सचिन सानप, मुख्याध्यापक जनार्धन बोडखे, संदीप खेडकर तसेच आशा गोला मॅडम उपस्थित होत्या. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून दहीहंडी उत्सव आनंदात पार पडला.

# जि. प. शाळेच्या गेटसमोर अनधिकृत टपरी

## विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**राशीन :** येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर उभारण्यात आलेल्या कथित अनधिकृत टपरीविरोधात रिपब्लिकन सेनेचे अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्ष विजयकुमार विलास साळवे आक्रमक झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित करत त्यांनी प्रशासनाकडे टपरी तात्काळ हटविण्याची मागणी केली आहे.

३० ऑगस्टच्या रात्री टपरी उभारण्यात आल्याचा दावा असून ती मुख्य विद्युत वाहिनीच्या पोलला लागून असल्याने विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, असा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. शाळेचे मुख्याध्यापक तसेच महावितरण कार्यालयानेही प्रशासनाचे लक्ष वेधल्याचे साळवे यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर प्रशासनाने चालढकल करू नये. टपरी तात्काळ हटवा; अन्यथा आंदोलन अटळ, असा इशारा विजय साळवे यांनी दिला आहे.

दरम्यान, बहुजन समाज पार्टीचे कर्जत-जामखेड विधानसभा प्रमुख दत्तात्रय सोनवणे, उद्धव ठाकरे शिवसेनेचे शहर प्रमुख जितेंद्र शेटे आणि युक्रांदचे शहर प्रमुख रुद्र राऊत यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर साळवे यांच्या मागण्यांना जाहीर पाठिंबा दिला आहे.

प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषद शाळेसमोर उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या या प्रश्नावर प्रशासन आता कोणती भूमिका घेते, याकडे राशीनकरांचे लक्ष लागले आहे.

# एनसीसीमध्ये विद्यार्थी घडतो आणि देशसेवेसाठी तयार होतो : बेहेरा



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासोबतच त्यांच्यामध्ये शिस्त, नेतृत्वगुण, आत्मविश्वास, देशभक्ती आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यात एनसीसीची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. एनसीसीच्या माध्यमातून विद्यार्थी केवळ प्रशिक्षण घेत नाही, तर एक जबाबदार, सक्षम आणि राष्ट्रनिष्ठ नागरिक म्हणून घडतो. एनसीसीमध्ये विद्यार्थी घडतो आणि देशसेवेसाठी तयार होतो, असे प्रतिपादन १७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, अहिल्यानगरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल प्रमोदकुमार बेहेरा यांनी केले.

श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज येथे १७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, अहिल्यानगरच्या वतीने कर्नल प्रमोदकुमार बेहेरा यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्सशी संवाद साधत एनसीसीचे महत्त्व, प्रशिक्षणातून मिळणाऱ्या विविध संधी, शिस्त, नेतृत्वगुण आणि राष्ट्रसेवेचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.

कर्नल बेहेरा यांचे स्वागत करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांनी एनसीसीच्या कार्याचे कौतुक केले. एनसीसीमुळे महाविद्यालयाला एक वेगळा जिवंतपणा मिळतो. एनसीसी कॅडेट्समुळे परिसरात शिस्त, उत्साह आणि सकारात्मक वातावरण निर्माण होते, असे त्यांनी सांगितले.



# बालमटाकळीत बालंबिका देवी मंदिराच्या प्रवेशद्वार कमानीचे लोकार्पण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी येथे शुक्रवार रोजी गोपालकृष्ण जयंतीच्या शुभमुहूर्तावर स्वर्गीय अशोक नहार यांच्या कुटुंबीयांनी स्वखर्चातून शेवगाव-गेवराई महामार्गालगत ग्रामपंचायतीच्या कार्यालयासमोरच उभारण्यात आलेल्या ग्रामदैवत श्री. बालंबिका देवी मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या कमानीचे लोकार्पण हे ब्राह्मणांच्या हस्ते विधिवत पूजा-आर्चा करून ह.भ.प. रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांच्या शुभहस्ते. आखेगाव येथील जोग महाराज संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. राम महाराज झिंजुर्के, मारुतराव घुले, काकासाहेब नरवडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी डॉ. राम बामदळे, रामनाथ राजपुरे, रसिक नहार, मोहनराव देशमुख, विक्रम बारवकर, हनुमान पातकळ, चंद्रकांत गरड, अशोक छाजेड, रावसाहेब भाकरे, वैजनाथ सुरवसे, बाळासाहेब दोडके, भानुदास गलधर, कासमभाई शेख, अरुण बामदळे, अशोक वाघुंबरे, प्रा. महालींग डोंगरे, भाऊसाहेब बामदळे, प्रशांत देशमुख, बाबसाहेब देशमुख, सुदामराव शिंदे, गजानन देशमुख, विठ्ठल देशमुख, धनंजय देशमुख, अशोक खिळे, हरिश्चंद्र घाडगे, मधुकर पाटेकर, दत्तात्रय भिसे, भारत घोरपडे, छगनराव राजपुरे, बाबुलाल शेख, शेखर बामदळे यांच्यासह प्रवेशद्वाराच्या लोकार्पणानिमित्त मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

# शिराळ येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शिराळ चिचोंडी :** पाथर्डी तालुक्यातील शिराळ येथे ह भ प भास्करगिरी महाराज देवगड यांच्या मार्गदर्शनाखालीशिराळ येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा सुरू असूनया सोहळ्यासाठी प्रत्यक्षात १०८ भाविक पारायणासाठी बसणार होते परंतु प्रत्यक्षात १७५ भाविक यापारायणासाठी बसले आहेत हे या गावाचे वैशिष्ट्य आहे.

भौतिक सुखातत मनुष्याला अध्यात्मकाचा काहीसा विसर पडत आहे प्रत्येकाच्या जीवनात निर्माण होणाऱ्या संकटावर मात करण्याची प्रेरणा व अध्यात्मक ज्ञानाची शिकवण तसेच अठरा विविध योगा बद्दलचे ज्ञान एकमेव ज्ञानेश्वरी ग्रंथातून मिळते तेव्हा प्रत्येकाने ज्ञानेश्वरी पारायण करावे असे प्रतिपादन व्यासपीठ चालक ह भ प नारायण महाराज गायके महालक्ष्मी हिवरे यांनी केले.

यावेळी नारायण महाराज म्हणाले की अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा येथील प्रवारा नदीतील संत ज्ञानेश्वरांनी ७३६ वर्षांपूर्वी सन,१२९०मध्ये ज्ञानेश्वरी ग्रंथाचे लेखन केले यात १८अध्याय७००श्लोक आणि९११२ओव्या आहेत संत निवृत्तीनाथ महाराजमहाराज होते मराठीचे आद्य संपादक संत एकनाथ यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथ शुद्ध करून लिहिला संत महिपती महाराजांनी ज्ञानेश्वरीचे संकलन केले तर संत नामदेव यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथाचा प्रसार केलाशिराळ येथे ज्ञानेश्वरी ची पारायण करायला मिळणे आपले भाग्य आहे. शिराळ येथे निस्कामकीर्तने सेवासुरू असून महाराज एक रुपयाही दक्षिणा घेत नाही हे या सप्ताहाचं खास वैशिष्ट्य आहे.

# पारनेर तालुक्याच्या उत्तर भागात विजेचा खेळखंडोबा

## शेतकऱ्यांचे खडकवाडी सबस्टेशनवर धरणे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

उत्तर भागातील वीजपुरवठ्याचा अक्षरशः खेळखंडोबा झाला आहे. पाऊस नसल्याने पिके आधीच अडचणीत आहेत. बाजरी, मूग, वाटाणा आणि कांदा वाचविण्यासाठी पाणी देणे गरजेचे आहे; मात्र कमी दाबाचा वीजपुरवठा व वारंवार खंडित होणाऱ्या विजेमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. महावितरणने तातडीने दखल घेऊन पूर्ण दाबाने वीजपुरवठा सुरळीत करावा. **संपत जाधव**

**टाकळी ढोकेश्वर :** पारनेर तालुक्याच्या उत्तर भागातील पळशी,वनकुटे, खडकवाडी,कामटवाडी,पोखरी,वारणवाडी,देसवडे परिसरातील शेतकरी गेल्या आठ दिवसांपासून महावितरणच्या अनियमित वीजपुरवठ्यामुळे त्रस्त झाले आहेत.गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. शेतीपिकांना पाणी देण्यासाठी वीजपुरवठा अत्यावश्यक असताना वारंवार वीज खंडित होत असल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी दि . ४ सप्टेंबर रोजी खडकवाडी येथील महावितरणच्या सबस्टेशनवर धरणे आंदोलन केले.

या भागातील शेतांमध्ये बाजरी, मूग, वाटाणा, कांदा यासह विविध पिके घेतलेली आहेत. पावसाअभावी ही पिके आधीच संकटात सापडली असून आता वीजपुरवठ्याच्या समस्येमुळे त्यांची अवस्था आणखी बिकट झाली आहे. पिकांना वेळेत पाणी मिळाले नाही तर हातातोंडाशी आलेले उत्पादन वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या परिसरातील वीजपुरवठा पूर्ण दाबाने होत नसल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. कमी दाबाचा वीजपुरवठा, वारंवार वीज खंडित होणे तसेच अनियमित वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शेतीसाठी पाण्याची गरज असताना वीज उपलब्ध होत नसल्याने पिकांना पाणी देणे कठीण झाले आहे.



यावेळी संपत जाधव, गणेश शिंदे, विलास तांबे, रवींद्र गागरे, विठ्ठल सुडके, महेंद्र झावरे, संजय शिंदे, गणेश सारबंदे, अशोक शिंदे, गोविंद गागरे, शुभम गागरे, हरीओम शिंदे, सतीश शिंदे, शुभम सारबंदे, विलास सागर, बाळू आग्रे, पप्पू मोढवे, जालिंदर बारवे, विजय बिलबिले, सचिन डुकरे, आकाश बिलबिले, किशोर पिंगळे, तुकाराम बिलबिले, मच्छिंद्र शिंदे, संकेत सरोदे यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

## द•ख•ल

### संत सेना पुण्यतिथीनिमित्त निघोज येथे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

**निघोज :** संत सेना पुण्यतिथी निमित्त निघोज येथे मंगळवार दि. ८ रोजी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संत सेना नाभिक संघटना व ग्रामस्थ यांनी दिली आहे.



सकाळी ८.३० वाजता प्रतिमा पुजन व सत्यनारायण महापूजा, ९.३० वाजता संगीत भजन व जुगलबंदी, वडजादेव संगीत भजनी मंडळ, ढोबळेवाडी व जारकरवाडी, व कन्हैया संगीत भजनी मंडळ या जुगलबंदी मध्ये सहभागी होणार आहेत. दुपारी १२ वाजता महाआरती व पुष्पवृष्टी, दुपारी १२.३० ते ५ महाप्रसाद, रात्री ८ वाजता श्रीराम भजनी मंडळ यांची भजन संध्या अशाप्रकारे दिवसभर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून निघोज येथील असंख्य देणगीदात्यांनी देणगी दिली आहे. पारनेर तालुका पत्रकार संघ, बारा बलुतेदार संघ व अल्पसंख्याक समाज, समस्त ग्रामस्थ निघोज, संत सेना नाभिक संघटना, मोरेश्वर गणेश मित्र मंडळ, मांगीरबाबा मित्र मंडळ निघोज आदी मंडळे यासाठी परिश्रम घेणार असून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन नाभिक समाज संघटना, अल्पसंख्याक समाज मंडळ, पारनेर तालुका पत्रकार संघ व बारा बलुतेदार संघ आदिंनी केले आहे.

### मळगंगा प्रसादालयाला ५१ हजार रुपये देणगी

**निघोज :** स्व. भागाजी आबाजी थोरात यांच्या स्मरणार्थ बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव थोरात यांनी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित मळगंगा प्रसादालयाला ५१ हजार रुपये देणगी दिली आहे. भागाजी थोरात यांचे नुकतेच



निधन झाले आहे. दशक्रिया विधी दिवशी थोरात यांनी ही देणगी जाहीर केली आहे. थोरात कुटुंब शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक क्षेत्रात अग्रगण्य आहे. स्व. थोरात हे मुंबई येथील नामांकित कंपनीत कार्यरत होते. यावेळी बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव थोरात यांनी सांगितले की मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद, उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ व सर्व पदाधिकारी व विश्वस्त मंडळ यांनी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब कवाद व माजी अध्यक्ष शांताराम लंके यांच्या कार्याचे अनुकरण करीत तिर्थक्षेत्र असो की पर्यटन स्थळ या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विकासकामे करीत गावच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट माध्यमातून गेली दोन वर्षांपूर्वी प्रसादालय सुरू केले आहे. दोन वर्षात जवळपास दिड लाख भावीक व गरजू यांना या अन्नदानाचा लाभ झाला आहे. अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. म्हणून बंधू भागाजी थोरात यांच्या स्मरणार्थ आम्ही प्रसादालयाला ५१ हजार रुपये देणगी दिली असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

### माळी बाभुळगावच्या जि. प. शाळेत दहीहंडी साजरी



**पाथर्डी शहर :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माळी बाभुळगाव येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देतानाच त्यांच्यातील संघभावना, शिस्त आणि आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने विविध मनोरंजनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. उत्सवानिमित्त विद्यार्थ्यांसाठी चमचा-लिंबू, संगीत खुर्ची यांसह विविध मनोरंजनात्मक स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्पर्धांचा मनमुराद आनंद लुटला. दहीहंडीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी एकजुटीने आकर्षक मानवी मनोरे तयार करून उपस्थितांची दाद मिळवली. विद्यार्थ्यांच्या उत्साहाने संपूर्ण शाळेचा परिसर आनंदाने आणि उत्साहाने भारून गेला होता. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानदेव कराड, कमलेश केदार तसेच पालक उपस्थित होते. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना केवळ मनोरंजनाची संधी मिळाली नाही, तर सहकार्य, संघभावना आणि एकोप्याचे महत्त्वही अनुभवता आले. शिक्षणासोबत संस्कार, संस्कृती आणि आनंददायी उपक्रमांची सांगड घालत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा हा दहीहंडी उत्सव माळी बाभुळगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी अविस्मरणीय ठरला.

### शेतकऱ्यांची अवस्था गंभीर; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**करंजी :** पावसाळ्याचे तीन महिने उलटून गेले तरी पाथर्डी तालुक्यात सरासरीच्या केवळ ५४ टक्के पाऊस झाला असून, पुरेसा पाऊस न झाल्याने तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे पाथर्डी तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात तातडीने दुष्काळ जाहीर करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी



पंचायत समिती पाथर्डीचे सभापती संभाजी किसनराव पालवे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, पावसाच्या जीवावर शेतकऱ्यांनी बाजरी, कापूस, मूग, तूर, मका, उडीद व सोयाबीन आदी खरीप पिकांची जवळपास ९० टक्के पेरणी केली. मात्र पेरणीनंतर अपेक्षित पाऊस न झाल्याने पिकांची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी पिके वाया जाण्याच्या मार्गावर आहेत. मागील तीन महिन्यांत समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा मोठा आर्थिक खर्च वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तसेच जनावरांच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची चिन्हे दिसत आहेत. काही ठिकाणी नागरिकांना आठ-आठ दिवसांनी पाणी मिळत असल्याने परिस्थिती गंभीर होत आहे. दुष्काळ जाहीर झाल्यास शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळू शकतो. जनावरांसाठी छावण्या, टँकरद्वारे पाणीपुरवठा, पीकपाणी उपलब्ध करून देणे तसेच नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करून मदत देणे आवश्यक आहे. त्यामुळे शासनाने तातडीने दुष्काळ जाहीर करून शेतकरी व नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी पालवे यांनी केली आहे.

# पाच महिन्यांत १० हजार रुग्णांना आरोग्यसेवेचा आधार!

## जेऊर प्राथमिक आरोग्य केंद्रात वाढती रुग्णसंख्या; १०४ कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया; १७ प्रसूती; ग्रामीण रुग्णालयाची मागणी

**शशिकांत पवार । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** ग्रामीण भागातील नागरिकांसाठी आरोग्यसेवेचे महत्त्वाचे केंद्र ठरलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कामकाजाला दिवसेंदिवस चांगली गती मिळत आहे. जेऊर आरोग्य केंद्रात गेल्या पाच महिन्यांत तब्बल दहा हजारांहून अधिक रुग्णांनी उपचार घेतल्याने आरोग्य केंद्रावरील नागरिकांचा वाढता विश्वास अधोरेखित होत आहे. वाढती रुग्णसंख्या आणि परिसरातील आरोग्यसेवेची गरज लक्षात घेता जेऊर प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रूपांतर करावे अशी मागणी जेऊर पंचक्रोशीतील ग्रामस्थांकडून जोर धरू लागली आहे.

जेऊर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात १६ गावांचा समावेश आहे. या गावांमधून उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे. प्राथमिक उपचारांसोबतच कुटुंब कल्याणाच्या १०४ शस्त्रक्रिया, दोन पुरुष नसबंदी, १७ प्रसूती,

> जेऊर आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा मिळाल्यास येथे तज्ज्ञ डॉक्टर, अधिक परिचारिका, प्रयोगशाळा सुविधा, प्रसूती व शस्त्रक्रियांसाठी आवश्यक साधनसामग्री तसेच इतर सेवा उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. रुग्णांचा वेळ, पैसा आणि प्रवासाचा त्रास वाचणार असून महिलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांना त्याचा लाभ होईल.
>
> **बाजीराव आवारे**




बालकांचे लसीकरण, विविध आजारांच्या रुग्णांच्या रक्त तपासण्या तसेच आयुष्मान भारत आरोग्य खाते उघडण्याचे कामही येथे प्रभावीपणे सुरू आहे. एप्रिल २०२६ पासून येथे पाच महिन्यात तब्बल दहा हजारच्या वर रुग्णांनी उपचार घेतले आहेत.

जेऊर उपकेंद्रातही तीन प्रसूती झाल्या आहेत. आरोग्य केंद्रातील ऑनलाइन कामकाजातही उल्लेखनीय प्रगती झाली असून आयुष्मान भारत आरोग्य खाते उघडण्याच्या कामात जिल्ह्यात अव्वल कामगिरी असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे उपचारासोबतच आरोग्यविषयक विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात केंद्राची भूमिका महत्त्वाची ठरत आहे.

वैद्यकीय अधिकारी डॉ. योगेश कर्डिले व डॉ. शंकर डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य केंद्रातील अधिकारी-कर्मचारी कामकाज करीत आहेत. छत्रपती संभाजीनगर महामार्गालगत हे केंद्र असल्याने महामार्गावरील अपघातग्रस्तांसाठीही केंद्र तातडीच्या उपचाराचा आधार ठरते. कोरोना काळात आरोग्य केंद्राकडे स्वतःची सुसज्ज इमारत नसतानाही उपलब्ध साधनसामग्रीच्या माध्यमातून वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रुग्णसेवा सुरू ठेवली होती. आता केंद्रासाठी सुसज्ज इमारत उभी राहिली असून आरोग्यसेवेचा विस्तार करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी ग्रामस्थ करीत आहेत. तालुक्यात नऊ प्राथमिक आरोग्य केंद्रे त्याअंतर्गत उपकेंद्रे कार्यरत असून, चिचोंडी पाटील येथे ग्रामीण रुग्णालय आहे. जेऊरची वाढती रुग्णसंख्या, १६ गावांचा समावेश, महामार्गावरील अपघातांचे प्रमाण आणि प्रसूतीसह विविध आरोग्यसेवांची वाढती गरज लक्षात घेता येथे ग्रामीण रुग्णालय झाल्यास पंचक्रोशीतील नागरिकांना मोठा फायदा होणार आहे.

> तालुक्यातील सर्व आरोग्य केंद्रे, चिचोंडी पाटील ग्रामीण रुग्णालय आणि उपकेंद्रांच्या माध्यमातून नागरिकांना सातत्याने दर्जेदार आरोग्यसेवा देण्याचा प्रयत्न सुरू आहे. सर्व आरोग्य केंद्रांमध्ये उपलब्ध मनुष्यबळ व सुविधांचा प्रभावी वापर करून रुग्णसेवा अधिक सक्षम करण्यावर भर दिला जात आहे. ग्रामीण रुग्णांना वेळेवर उपचार, प्रसूतीसेवा, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया, लसीकरण आणि विविध शासकीय आरोग्य योजनांचा लाभ मिळावा यासाठी आरोग्य विभाग कटिबद्ध आहे.
>
> **- डॉ. विनोद काकडे**

# चिमुकल्यांनी सांभाळली गुरुजींची भूमिका!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**करंजी :** एरवी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली धडे गिरविणाऱ्या चिमुकल्यांनी शुक्रवारी थेट गुरुजींची भूमिका सांभाळली. हातात खडू घेत वर्गासमोर उभे राहत आपल्या सवंगड्यांना धडेही दिले. निमित्त होते शिक्षक दिनाचे. मिरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक दिनासह गोपाळकाला उत्साहात साजरा करण्यात आला.

सकाळच्या सत्रात गोपाळकाल्यानिमित्त शाळेत दहीहंडीचे आयोजन करण्यात आले. बालगोपाळांनी एकत्र येत दहीहंडी फोडून श्रीकृष्ण जन्माष्टमीचा आनंद साजरा केला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शाळेचा परिसर उत्साहाने भारावून गेला.

त्यानंतर शिक्षक दिनानिमित्त इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारली. विविध वर्गांची जबाबदारी घेत त्यांनी विद्यार्थ्यांना शिकविले. नेहमी बाकावर बसून शिक्षकांकडून धडे घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वतः शिक्षक बनून अध्यापनाचा अनुभव घेतला. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी हा शिक्षक दिन विशेष ठरला.

शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी शिक्षकांना छोटेखानी भेटवस्तू दिल्या. तसेच केक कापून शिक्षक दिनाचा आनंद द्विगुणित केला.

बालगुरुजींचे कौतुक, महाविद्यालये व माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थी शिक्षक बनण्याचा उपक्रम नेहमीच पाहायला मिळतो. मात्र प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांनीही शिक्षकांची भूमिका समर्थपणे साकारत वर्गात अध्यापन केल्याने शिक्षकांनी त्यांचे विशेष कौतुक केले. राजाभाऊ पालवे, सुहास ठिपसे, सिमोन साळवे, प्रसाद ससाणे, मनिषा दळवी, संगीता पवार, संगीता आडकर, तृप्ती पडघलमल व शीला सोनवणे यांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त केला.

# आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव :** नवमहाराष्ट्र शिक्षण मंडळाचे आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय येथे ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचे आगमन झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अनिता भालसिंग यांनी केले. त्यांच्या प्रास्ताविकामध्ये कार्यक्रमाचा उद्देश व शिक्षकावर काव्यवाचन शीर्षक गुरुने दिला ज्ञानरूपी वसा या दिनानिमित्त त्यांनी केले.त्यानंतर अध्यक्षीय सूचना कु. खरात प्रिया यांनी मांडली, तर अनुमोदन कु. कणके अलिशा यांनी केले. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आले. भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले कु. ससाणे निकिता व खंडागळे महेश, सरोदे प्रिया, यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त करून शिक्षकांप्रती असलेला आदर व कृतज्ञता व्यक्त केली. अशा प्रकारे शिक्षक दिनाचा कार्यक्रम आनंददायी, प्रेरणादायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमासाठी प्रा. राजेंद्र बांगर, प्रा. राम नेव्हल प्रा. काळे राजेंद्र तसेच कार्यालयीन कर्मचारी सुमित पंचारिया व ग्रंथालयाचे शिक्षक आशिष गोंडाने हे उपस्थित होते. द्वितीय वर्षाचे विद्यार्थी उपस्थित होते.

# शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शिल्पकार : प्रा. सुपेकर



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा शिल्पकार असल्याचे प्रतिपादन सेवानिवृत्त प्राचार्य तथा पठारवाडी येथील पसायदान सेवाभावी सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रामचंद्र महाराज सुपेकर यांनी व्यक्त केले आहे. श्री. मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज येथे सांस्कृतिक विभागाच्या वतीने शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. दि. ५ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित या कार्यक्रमास प्राचार्य मा. डॉ. आहेर सर, उपप्राचार्य, प्राध्यापकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थी-शिक्षक साक्षी रसाळ यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य, उपप्राचार्य, विद्यार्थी प्राचार्य, विद्यार्थी उपप्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांचा सत्कार करण्यात आला. विश्वामित्र ऋषींनी कितीही प्रयत्न केले पण राजा हरिश्चंद्र सत्वापासून ढळला नाही. गुरुला कमीपणा येऊ नये म्हणून राज्य, देह, पत्नी, पुत्र सर्व काही समर्पित केले. सुपेकर सरांनी गुरूंच्या सामर्थ्याची जाणीव करून दिली. हिरा ठेविता ऐरणी/वाचे मारी ता जो घनी/ तोच मोल पावे खरा/करणीचा होय चुरा/ हिऱ्याच्या गुणधर्माचे उदाहरण देताना, जसा हिरा घासून-पुसून व पैलू पाडल्यानंतर त्याचे सौंदर्य व मूल्य खुलून दिसते, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण ओळखून त्यांना योग्य संस्कार व शिक्षणाच्या माध्यमातून पैलू पाडण्याचे काम शिक्षक करतात.

# शाळेच्या वाटेवरच जीवघेणा धोका!

## जेऊरच्या चौकांत विद्यार्थ्यांची 'अग्निपरीक्षा'

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील जेऊर येथील मुख्य चौक आणि महावितरण कंपनी चौक शालेय विद्यार्थी व नागरिकांसाठी दिवसेंदिवस धोकादायक ठरत आहेत. महामार्गावरून सुसाट वेगाने धावणारी वाहने, चौकातील वाढती वर्दळ आणि पादचाऱ्यांसाठी सुरक्षित मार्गाचा अभाव यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. अपघात घडण्याची प्रतीक्षा न करता प्रशासनाने दोन्ही चौकांवर तातडीने ठोस सुरक्षा उपाययोजना कराव्यात अशी मागणी पंचक्रोशीतील पालक, विद्यार्थी व ग्रामस्थांमधून होत आहे.

इमामपूर, चापेवाडी, धनगरवाडी, तोडमल वस्ती, शेटे वस्ती, माळखास, गवारे वस्ती या परिसरातून असंख्य विद्यार्थी दररोज जेऊर येथे शिक्षणासाठी येतात. अनेक विद्यार्थी सायकलने तर काही विद्यार्थी पायी प्रवास करतात. चौकांमध्ये विद्यार्थ्यांना



> **चौकात सुरक्षा उपाययोजना करा!**
>
> जेऊर मुख्य चौक व महावितरण कंपनी चौकात वाहनांची वर्दळ वाढल्याने शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. चौकात स्पीड ब्रेकर, गतिरोधक पट्टे, दिशादर्शक फलक, झेब्रा क्रॉसिंग व आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी पालक वर्गातून होत आहे. विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात येण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात अशी अपेक्षाही पालकांनी व्यक्त केली.

भरधाव वाहनांमधून वाट काढत रस्ता ओलांडावा लागतो. मुलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी नेमकी कोणाची? असा सवाल आता पालकांकडून उपस्थित केला जात आहे.

मुख्य चौक व महावितरण कंपनी चौकात यापूर्वीही अपघाताच्या घटना घडल्या आहेत. या दुर्घटनांमध्ये अनेक निष्पापांना जीव गमवावा लागला असून काहींना कायमचे अपंगत्व आले आहे.

त्यामुळे एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा अपघात होण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक पावले उचलणे गरजेचे आहे.

दोन्ही चौकांवर रंबल स्ट्रिप्स, गतीरोधक, वेगमर्यादा फलक, झेब्रा क्रॉसिंग, पुरेशी प्रकाशव्यवस्था, दिशादर्शक व चेतावणी फलक, ब्लिंकर तसेच आवश्यकतेनुसार सिग्नल लाईट बसविण्याची गरज आहे. चौक परिसरात सीसीटीव्ही बसवून नियम तोडणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याची व्यवस्थाही करावी अशी मागणी होत आहे.

# चापडगाव माध्यमिक विद्यालयात शिक्षक दिन साजरा

**शेवगाव :** ये बाळा शांत बस ... बडबड करू नका.. बाहेर काय पाहते ... निट वाचा... लक्ष दया... सांग या प्रश्नाचे उत्तर ... अशा असंख्य प्रश्नांचा भडीमार करत नवागत शिक्षकांनी शिकवण्याचे कार्य केले. चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षक दिन कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य संपत दसपुते हे होते. कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य सुनिल जायभाये, पर्यवेक्षक संजय दुधाडे, नवागत प्राचार्य साक्षी लोहकरे, शिवम नागरगोजे, उपमुख्याध्यापक श्रद्धा मडके, कृतिका नवले, पर्यवेक्षक विश्वास दहिफळे, संस्कृती लोहकरे आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष संपत दसपुते आपल्या अध्यक्षिय भाषणात म्हणाले की, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म सामान्य कुटुंबात झाला. घरची परिस्थिती हालाखीची असताना देखील उच्च शिक्षण घेवून शिक्षक होवून पवित्र ज्ञानदानाचे कार्य केले.

# शिक्षक दिनी शिक्षकांचे काळ्या फिती लावून धरणे आंदोलन

## २८ सप्टेंबरपासून मुंबईत बेमुदत आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** जुन्या पेन्शन योजनेपासून वंचित ठेवण्यात आल्याच्या निषेधार्थ राज्यातील माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शिक्षक दिनी, शनिवारी (दि. ५ सप्टेंबर) अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काळ्या फिती लावून धरणे आंदोलन केले. जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीसाठी आंदोलक शिक्षकांनी जोरदार घोषणाबाजी करीत शासनाच्या धोरणाचा निषेध केला. आंदोलकांच्या घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर दणाणून गेला.

जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव तथा जुन्या पेन्शन योजना समन्वय संघाचे राज्य समन्वयक महेंद्र हिंगे, राज्य समन्वयक सुनील भोर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी सुनील पंडित, आप्पासाहेब शिंदे, बाबासाहेब बोडखे, रमजान हवालदार, आप्पासाहेब जगताप, सचिन झगडे, भाऊसाहेब कचरे, देविदास खेडकर, संजय इघे, सुनील दानवे, संजय वाळे, राज गवांदे, संजय भुसारी, सुदाम दळवी, वैभव सांगळे, जाकीर सय्यद, कैलास राहणे, मिथुन डोंगरे आदींसह जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

दि. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या विनाअनुदानित अथवा अंशतः अनुदानित कायम आस्थापनेवरील नियमित वेतनश्रेणीतील तसेच त्यानंतर १०० टक्के अनुदान प्राप्त प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आणि तुकड्यांवरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

राज्यातील सुमारे २६ हजार पेन्शनपीडित शिक्षक-कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. या मागणीसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यापूर्वी विविध आंदोलने, निवेदने, मोर्चे आणि इतर लोकशाही मार्गांचा अवलंब करून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र, वारंवार आंदोलने करूनही या प्रश्नावर शासनाकडून अद्याप ठोस निर्णय घेण्यात आलेला नसल्याचा आरोप जुन्या पेन्शन योजना समन्वय संघाने केला आहे.

शिक्षकांचा सन्मान करण्याचा दिवस म्हणून शिक्षक दिन साजरा केला जात असतानाच शिक्षकांनाच आपल्या न्याय्य हक्कासाठी आंदोलन करावे लागत असल्याची खंत आंदोलकांनी व्यक्त केली. शिक्षणाच्या माध्यमातून समाज आणि भावी पिढी घडविणाऱ्या शिक्षकांच्या भविष्याशी संबंधित पेन्शनचा प्रश्न शासनाने गांभीर्याने सोडवावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात दि. १ ते ४ सप्टेंबरदरम्यान शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शाळांमध्ये



काळ्या फिती बांधून नियमित शैक्षणिक कामकाज केले. काळ्या फितींच्या माध्यमातून शासनाच्या धोरणाचा निषेध नोंदवित प्रलंबित जुन्या पेन्शनच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले.

शासनाकडून सकारात्मक निर्णय न झाल्यास दि. २८ पासून मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यानंतर दि. २ ऑक्टोबर २०२६, महात्मा गांधी जयंतीपासून आमरण उपोषण करण्याचा निर्धारही संघटनेने व्यक्त केला आहे. याशिवाय आगामी विधानपरिषद निवडणुकीमध्ये शिक्षक, कर्मचारी, पदवीधर, विद्यार्थी व पालकांच्या माध्यमातून लोकशाही मार्गाने मतदानावर बहिष्कार घालण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे. निवेदनात आंदोलनकर्त्यांनी १९८२ च्या जुन्या सेवानिवृत्ती वेतन योजनेचे आपण न्यायिक व हक्कदार असूनही शासनाकडून न्याय मिळत नसल्यास राज्यातील सुमारे २६ हजार पेन्शनपीडित बांधवांना इच्छामरणाची परवानगी द्यावी, अशी मागणी केली आहे.

## द·ख·ल



# हातगाव जि.प.शाळेत दहीहंडीचा कार्यक्रम उत्साहात

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा हातगाव येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त सालाबादप्रमाणे या ही वर्षी दहीहंडीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व आनंदाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण, राधा तसेच गोप-गोपींच्या वेशभूषेत सहभागी होत कार्यक्रमाची शोभा वाढवली.अशी माहिती शाळेचे मुख्याध्यापक गणेश पुरुषोत्तम यांनी दिली आहे. यावेळी शाळेसमोरील प्रांगणामधे विद्यार्थ्यांनी पारंपरिक गाणी, नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांनी मानवी मनोरे रचून दहीहंडी फोडण्याचा आनंद घेतला. संपूर्ण शाळेच्या परिसरात उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाचे आयोजन शाळेतील शिक्षकवृंद यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम संस्मरणीय ठरला. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी व असंख्य पालकांनी उपस्थित राहूनच दहीहंडीचा आनंद घेतला.

# बाबुजी आव्हाड महाविद्यालयात शिक्षक दिन



**पाथर्डी शहर :** ज्या खुर्चीत बसून शिक्षक विद्यार्थ्यांना घडवतात, त्याच खुर्चीत शुक्रवारी विद्यार्थी विराजमान झाले...! वर्गात ज्ञानाचे धडे देणारे विद्यार्थी शिक्षक बनले आणि महाविद्यालयाचा कारभार सांभाळण्याची जबाबदारीही त्यांनी समर्थपणे पेलली. बाबुजी आव्हाड महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त राबविण्यात आलेल्या या अनोख्या उपक्रमाने संपूर्ण महाविद्यालयाचे वातावरण उत्साहाने भारून गेले. विद्यार्थ्यांना केवळ शिक्षक दिन साजरा करण्यापुरते मर्यादित न ठेवता शिक्षकांची भूमिका, जबाबदारी आणि नेतृत्व प्रत्यक्ष अनुभवता यावे, या उद्देशाने एकदिवसीय शिक्षक व प्राचार्य उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना अध्यापन, शिस्त, नियोजन, निर्णयक्षमता आणि नेतृत्वगुणांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे होते. व्यासपीठावर पर्यवेक्षक प्रा. सलीम शेख, प्रा. ब्रम्हानंद दराडे, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. अशोक डोळस, डॉ. वैशाली आहेर, प्रा. आशा पालवे, तसेच एकदिवसीय प्राचार्य साहिल शेख व हिना शेख उपस्थित होते. यावेळी शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. प्रा. सलीम शेख व डॉ. वैशाली आहेर यांनी मनोगत व्यक्त केले. पंकज बुधवंत, मारिया सिरसे, कशीश तांबोळी, शितल बडे, शितल शिरसाट, अभिषेक गायकवाड, मानसी खुटके, आकाश धनगर, अलोक बंग, प्रतिज्ञा रासकर, कांचन गव्हाणे व सय्यद खुशी यांनी मनोगत व्यक्त करून शिक्षकांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त केली. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या जीवनाचे शिल्पकार असल्याचे सांगितले. एक शिक्षक चुकला तर एक पिढी बरबाद होऊ शकते, असे सांगत त्यांनी शिक्षकांच्या जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित केले.

# प्रा. जयश्री कावले युजीसी नेट परीक्षेत उत्तीर्ण!



**शहराटाकळी :** श्रीरामपूर येथील येथील रयत शिक्षण संस्थेच्या प्रसिद्ध रा.ब.नारायणराव बोरावके कॉलेज (स्वायत्त) मधील संगणकशास्त्र विभागात कार्यरत असलेल्या प्राध्यापिका जयश्री तात्याराव कावले यांनी अत्यंत प्रतिष्ठेच्या 'युजीसी नेट' राष्ट्रीय पात्रता परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांनी संगणकशास्त्र विषयातून ३०० पैकी १६४ गुण मिळवून या परीक्षेत उत्तीर्ण होण्याचा बहुमान मिळवला आहे. प्रा. जयश्री कावले यांचे माहेर शाहरटाकळी (ता. शेवगाव) येथे आहे. एका ग्रामीण भागातून पुढे येत त्यांनी घेतलेली ही झेप अत्यंत कौतुकास्पद आहे. आपल्या कन्येच्या या यशाबद्दल त्यांचे वडील तात्याराव कावले यांनी अत्यंत सार्थ अभिमान आणि आनंद व्यक्त केला आहे. मुलीच्या मेहनतीला अखेर योग्य फळ मिळाल्याची भावना त्यांनी बोलून दाखवली. प्राध्यापकीचे कर्तव्य चोख बजावत, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि नियमित अभ्यास या दोन्हीचा योग्य मेळ घालत त्यांनी हे यश खेचून आणले. त्यांच्या या यशामुळे शेवगाव आणि श्रीरामपूर परिसरातील, विशेषतः संगणकशास्त्र विभागात शिकणाऱ्या इतर ग्रामीण विद्यार्थ्यांनाही मोठी प्रेरणा मिळणार आहे.

# आबासाहेब काकडे कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक दिन संपन्न




**एरंडगाव :** कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे आबासाहेब काकडे कनिष्ठ महाविद्यालय, शेवगाव येथे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन ५ सप्टेंबर हा शिक्षक दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित महाविद्यालयाचे डॉ. लक्ष्मण बिटाळ, अशोक तमनर, रवींद्र आगळे, सुनील आढाव, रूपा खेडकर, गणपत शेलार, सखाराम घावटे तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू-भगिनी आदि मान्यवर उपस्थित होते. कु. वैष्णवी बडधे, आदित्य माळी, तेजस खैरे, श्रुती घुगे, परिणीती कवडे आणि तनिष्का आंधळे या विद्यार्थी शिक्षकांनी अध्यापन करताना आलेले अनुभव उपस्थितांसमोर मांडले. विद्यार्थी प्राचार्य म्हणून जबाबदारी स्वीकारलेल्या कु. पूजा लोंढे हिने प्राचार्यपदाची भूमिका पार पाडताना आलेले अनुभव व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अतिथी रूपा खेडकर यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांचा तसेच गुरुजनांचा नेहमी आदर करावा, असे आवाहन केले. प्रमुख अतिथी श्री. गणपत शेलार यांनी शिक्षकच विद्यार्थ्यांना यशाचा खरा मार्ग दाखवतात, असे सांगितले. माजी प्रा. सखाराम घावटे यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या विचारांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

# कर्जत तालुक्यातील ९२ ग्रामपंचायतींपैकी तब्बल ७५ ग्रामपंचायत विना कारभारी!

## २३ ऑगस्टपासून प्रशासक गैरहजर; नागरी सुविधेसह गाव कारभाराची ऐसीतैशी

**डॉ अफरोजखान पठाण। राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** जवळपास एक पंचवार्षिक संपत आली तरी जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गण विना लोकप्रतिनिधी विकासकामापासून वंचित राहिले आहे. तीच भर कर्जत तालुक्यातील एकूण ९२ ग्रामपंचायतीपैकी जवळपास ७५ ग्रामपंचायतीची झाली आहे. ७५ ग्रामपंचायतीवर प्रशासक राज असून २३ ऑगस्टला ती देखील मुदत संपली असून विना लोकप्रतिनिधी आणि विना प्रशासक अशी गत स्थानिक स्वराज्य संस्थेची झाली. ही लोकशाहीची पायमल्ली नाही का ? असा सवाल सर्वसामान्य नागरिकांसह राजकीय पदाधिकारी देखील उपस्थित करीत आहे.

**कर्जत तालुक्यातील या १७ ग्रामपंचायतीवर सरपंच आणि राजकीय बॉडी अस्तित्वात - सुर्यवंशी**

कर्जत तालुक्यातील एकूण ९२ ग्रामपंचायतीपैकी अवघ्या १७ च ग्रामपंचायतीवर सरपंच नियुक्त आहे. त्या ग्रामपंचायतीची नावे पुढीलप्रमाणे : अळसुंदे, कापरेवाडी म्हाळगी, मुळेवाडी, बहिरोबावाडी, निंबे, कौडाने, कोपर्डी, बजरंगवाडी, कोरेगाव, कुळधरण, खेड, औटेवाडी, गणेशवाडी, वायसेवाडी, करमणवाडी आणि कुंभेफळ

२०२२ साली जिल्हा परिषद सदस्य आणि पंचायत समिती सदस्यांची मुदत संपली आहे. जवळपास एक पंचवार्षिक होत आली तरी स्थानिक स्वराज्याची मिनी आमदारकी निवडणूक प्रलंबित राहिल्याने गावपातळीवरचा विकास खुंटला आहे. मात्र यावर उचित कार्यवाही होताना दिसत नाही. तोच कित्ता कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये देखील दिसत आहे. कर्जत तालुक्यात एकूण ९२ ग्रामपंचायती अस्तित्वात असून यापैकी अवघ्या १७ ग्रामपंचायतीची अधिकृत राजकीय पदाधिकाऱ्यांची बॉडी नियमानुसार कार्यान्वित आहे. तर तब्बल ७५ ग्रामपंचायतीवर प्रशासक नियुक्ती आहे. आता तर २३ ऑगस्टपासून वरील ग्रामपंचायत देखील विना कारभारी टाळेबंद अवस्थेत पडल्याने गावपातळीवरच्या विकासाचे काय ? असा सवाल सर्वसामान्य नागरिकांसह राजकीय पदाधिकाऱ्यांना पडला आहे. राजकीय आरक्षणात २०२४-२५ साली २१ ग्रामपंचायतीवर अधिकारी प्रशासक नियुक्त होते.

मात्र त्यात फेब्रुवारी २०२६ ला आणखी ५४ ग्रामपंचायतीची भर पडली. शासनाच्या नवीन आदेशानुसार ५४ ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंचानाच प्रशासक म्हणून ६ महिन्यासाठी मुदतवाढ देत नियुक्ती देण्यात आली होती. मात्र २३ ऑगस्टला त्याचा देखील अवधी संपला आहे. विना कारभारी कर्जत तालुक्यातील ५ जिल्हा परिषद गट, १० पंचायत समिती गण आणि तब्बल ७५ ग्रामपंचायतीच्या मतदारांसह गावपातळीवरचा विकास खुंटला आहे. सर्वसामान्य जनतेच्या सुविधेची ऐसी-तैशी घडली आहे. नागरिक देखील शासनाच्या विविध योजनेपासून वंचित राहत असून गरजवंतना न्याय मिळणे कठीण झाले आहे. त्यामुळे पुन्हा नवीन प्रशासकास वाढीव काळ मिळणार की ? रखडलेल्या निवडणुका पार पाडणार याकडे लक्ष लागले आहे.

कर्जत तालुक्यातील तब्बल ७५ ग्रामपंचायतीवर प्रशासक राज असून यामुळे गावाचा विकास थांबला असून सर्वसामान्य नागरिक सुविधेपासून वंचित राहण्याच्या घटना घडत आहे. वास्तविक पाहता २०२४-२५ ला बेनवडी, कोळवडी, जळकेवाडी, खातगाव, लोणी-मसदपूर, माही, निंबोडी, सितपुर, शिंदे, नवसरवाडी, जळगाव, बिटकेवाडी, राशीन, काळेवाडी, सोनाळवाडी, देशमुखवाडी, कानगुडवाडी, परिटवाडी, आंबिजळगाव, तोरकडवाडी आणि घुमरी या २१ गावांचा समावेश होता. तर फेब्रुवारी २०२६ ला यात आणखी ५४ ग्रामपंचायतीची भर पडली आहे.

## द•ख•ल

### संत सेना पुण्यतिथीनिमित्त निघोज येथे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

**निघोज :** संत सेना पुण्यतिथी निमित्त निघोज येथे मंगळवार दि. ८ रोजी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संत सेना नाभिक संघटना व ग्रामस्थ यांनी दिली आहे.



सकाळी ८.३० वाजता प्रतिमा पुजन व सत्यनारायण महापूजा, ९.३० वाजता संगीत भजन व जुगलबंदी, वडजादेव संगीत भजनी मंडळ, ढोबळेवाडी व जारकरवाडी, व कन्हैया संगीत भजनी मंडळ या जुगलबंदी मध्ये सहभागी होणार आहेत. दुपारी १२ वाजता महाआरती व पुष्पवृष्टी, दुपारी १२.३० ते ५ महाप्रसाद, रात्री ८ वाजता श्रीराम भजनी मंडळ यांची भजन संध्या अशाप्रकारे दिवसभर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून निघोज येथील असंख्य देणगीदात्यांनी देणगी दिली आहे. पारनेर तालुका पत्रकार संघ, बारा बलुतेदार संघ व अल्पसंख्याक समाज, समस्त ग्रामस्थ निघोज, संत सेना नाभिक संघटना, मोरेश्वर गणेश मित्र मंडळ, मांगीरबाबा मित्र मंडळ निघोज आदी मंडळे यासाठी परिश्रम घेणार असून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन नाभिक समाज संघटना, अल्पसंख्याक समाज मंडळ, पारनेर तालुका पत्रकार संघ व बारा बलुतेदार संघ आदिंनी केले आहे.

### मळगंगा प्रसादालयाला ५१ हजार रुपये देणगी

**निघोज :** स्व. भागाजी आबाजी थोरात यांच्या स्मरणार्थ बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव थोरात यांनी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित मळगंगा प्रसादालयाला ५१ हजार रुपये देणगी दिली आहे. भागाजी थोरात यांचे नुकतेच



निधन झाले आहे. दशक्रिया विधी दिवशी थोरात यांनी ही देणगी जाहीर केली आहे. थोरात कुटुंब शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक क्षेत्रात अग्रगण्य आहे. स्व. थोरात हे मुंबई येथील नामांकित कंपनीत कार्यरत होते. यावेळी बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव थोरात यांनी सांगितले की मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद, उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ व सर्व पदाधिकारी व विश्वस्त मंडळ यांनी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब कवाद व माजी अध्यक्ष शांताराम लंके यांच्या कार्याचे अनुकरण करीत तिर्थक्षेत्र असो की पर्यटन स्थळ या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विकासकामे करीत गावच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट माध्यमातून गेली दोन वर्षांपूर्वी प्रसादालय सुरू केले आहे. दोन वर्षात जवळपास दिड लाख भावीक व गरजू यांना या अन्नदानाचा लाभ झाला आहे. अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. म्हणून बंधू भागाजी थोरात यांच्या स्मरणार्थ आम्ही प्रसादालयाला ५१ हजार रुपये देणगी दिली असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

### माळी बाभुळगावच्या जि. प. शाळेत दहीहंडी साजरी



**पाथर्डी शहर :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माळी बाभुळगाव येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देतानाच त्यांच्यातील संघभावना, शिस्त आणि आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने विविध मनोरंजनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. उत्सवानिमित्त विद्यार्थ्यांसाठी चमचा-लिंबू, संगीत खुर्ची यांसह विविध मनोरंजनात्मक स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्पर्धांचा मनमुराद आनंद लुटला. दहीहंडीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी एकजुटीने आकर्षक मानवी मनोरे तयार करून उपस्थितांची दाद मिळवली. विद्यार्थ्यांच्या उत्साहाने संपूर्ण शाळेचा परिसर आनंदाने आणि उत्साहाने भारून गेला होता. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानदेव कराड, कमलेश केदार तसेच पालक उपस्थित होते. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना केवळ मनोरंजनाची संधी मिळाली नाही, तर सहकार्य, संघभावना आणि एकोप्याचे महत्त्वही अनुभवता आले. शिक्षणासोबत संस्कार, संस्कृती आणि आनंददायी उपक्रमांची सांगड घालत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा हा दहीहंडी उत्सव माळी बाभुळगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी अविस्मरणीय ठरला.

### शेतकऱ्यांची अवस्था गंभीर; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**करंजी :** पावसाळ्याचे तीन महिने उलटून गेले तरी पाथर्डी तालुक्यात सरासरीच्या केवळ ५४ टक्के पाऊस झाला असून, पुरेसा पाऊस न झाल्याने तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे पाथर्डी तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात तातडीने दुष्काळ जाहीर करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी



पंचायत समिती पाथर्डीचे सभापती संभाजी किसनराव पालवे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, पावसाच्या जीवावर शेतकऱ्यांनी बाजरी, कापूस, मूग, तूर, मका, उडीद व सोयाबीन आदी खरीप पिकांची जवळपास ९० टक्के पेरणी केली. मात्र पेरणीनंतर अपेक्षित पाऊस न झाल्याने पिकांची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी पिके वाया जाण्याच्या मार्गावर आहेत. मागील तीन महिन्यांत समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा मोठा आर्थिक खर्च वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तसेच जनावरांच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची चिन्हे दिसत आहेत. काही ठिकाणी नागरिकांना आठ-आठ दिवसांनी पाणी मिळत असल्याने परिस्थिती गंभीर होत आहे. दुष्काळ जाहीर झाल्यास शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळू शकतो. जनावरांसाठी छावण्या, टँकरद्वारे पाणीपुरवठा, पीकपाणी उपलब्ध करून देणे तसेच नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करून मदत देणे आवश्यक आहे. त्यामुळे शासनाने तातडीने दुष्काळ जाहीर करून शेतकरी व नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी पालवे यांनी केली आहे.

# राधा-कृष्णाच्या वेशभूषेत बालगोपालांचा जल्लोष

## गीतांच्या तालावर दहीहंडी फोडत विद्यार्थ्यांनी लुटला आनंद



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी शहर :** एकलव्य शिक्षण संस्थेच्या मा. बबनराव ढाकणे प्राथमिक शाळेत दहीहंडी उत्सव उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, राधा-कृष्णाची वेशभूषा आणि गीतांच्या तालावर रंगलेला दहीहंडी सोहळा यामुळे शाळेचा परिसर कृष्णमय झाला होता.

दहीहंडी उत्सवानिमित्त विद्यार्थ्यांनी राधा-कृष्णाची वेशभूषा धारण करून शाळेत उपस्थिती लावली. पारंपरिक वेशभूषेतील बालगोपालांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. गीतांच्या तालावर विद्यार्थ्यांनी उत्साहात दहीहंडी फोडली. हंडी फुटताच विद्यार्थ्यांनी जल्लोष करत आनंद व्यक्त केला. त्यानंतर विद्यार्थ्यांना लाह्यांचा प्रसाद वाटप करण्यात आला.

सण-उत्सवांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती आणि परंपरांची ओळख व्हावी, त्यांच्यात सांघिक भावना, एकोपा आणि संस्कार रुजावेत, तसेच विविध सांस्कृतिक उपक्रमांतून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शालेय जीवनात अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आनंदासोबतच सामूहिक सहभागाचे महत्त्वही अनुभवता येते.

कार्यक्रमास शिक्षिका ऋतुजा दसपुते, श्रद्धा चट, सारिका गोरे, शिक्षक सचिन सानप, मुख्याध्यापक जनार्धन बोडखे, संदीप खेडकर तसेच आशा गोला मॅडम उपस्थित होत्या. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून दहीहंडी उत्सव आनंदात पार पडला.

# जि. प. शाळेच्या गेटसमोर अनधिकृत टपरी

## विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**राशीन :** येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर उभारण्यात आलेल्या कथित अनधिकृत टपरीविरोधात रिपब्लिकन सेनेचे अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्ष विजयकुमार विलास साळवे आक्रमक झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित करत त्यांनी प्रशासनाकडे टपरी तात्काळ हटविण्याची मागणी केली आहे.

३० ऑगस्टच्या रात्री टपरी उभारण्यात आल्याचा दावा असून ती मुख्य विद्युत वाहिनीच्या पोलला लागून असल्याने विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, असा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. शाळेचे मुख्याध्यापक तसेच महावितरण कार्यालयानेही प्रशासनाचे लक्ष वेधल्याचे साळवे यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर प्रशासनाने चालढकल करू नये. टपरी तात्काळ हटवा; अन्यथा आंदोलन अटळ, असा इशारा विजय साळवे यांनी दिला आहे.

दरम्यान, बहुजन समाज पार्टीचे कर्जत-जामखेड विधानसभा प्रमुख दत्तात्रय सोनवणे, उद्धव ठाकरे शिवसेनेचे शहर प्रमुख जितेंद्र शेटे आणि युक्रांदचे शहर प्रमुख रुद्र राऊत यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर साळवे यांच्या मागण्यांना जाहीर पाठिंबा दिला आहे.

प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषद शाळेसमोर उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या या प्रश्नावर प्रशासन आता कोणती भूमिका घेते, याकडे राशीनकरांचे लक्ष लागले आहे.

# एनसीसीमध्ये विद्यार्थी घडतो आणि देशसेवेसाठी तयार होतो : बेहेरा



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासोबतच त्यांच्यामध्ये शिस्त, नेतृत्वगुण, आत्मविश्वास, देशभक्ती आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यात एनसीसीची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. एनसीसीच्या माध्यमातून विद्यार्थी केवळ प्रशिक्षण घेत नाही, तर एक जबाबदार, सक्षम आणि राष्ट्रनिष्ठ नागरिक म्हणून घडतो. एनसीसीमध्ये विद्यार्थी घडतो आणि देशसेवेसाठी तयार होतो, असे प्रतिपादन १७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, अहिल्यानगरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल प्रमोदकुमार बेहेरा यांनी केले.

श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज येथे १७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, अहिल्यानगरच्या वतीने कर्नल प्रमोदकुमार बेहेरा यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्सशी संवाद साधत एनसीसीचे महत्त्व, प्रशिक्षणातून मिळणाऱ्या विविध संधी, शिस्त, नेतृत्वगुण आणि राष्ट्रसेवेचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.

कर्नल बेहेरा यांचे स्वागत करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांनी एनसीसीच्या कार्याचे कौतुक केले. एनसीसीमुळे महाविद्यालयाला एक वेगळा जिवंतपणा मिळतो. एनसीसी कॅडेट्समुळे परिसरात शिस्त, उत्साह आणि सकारात्मक वातावरण निर्माण होते, असे त्यांनी सांगितले.



# बालमटाकळीत बालंबिका देवी मंदिराच्या प्रवेशद्वार कमानीचे लोकार्पण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी येथे शुक्रवार रोजी गोपालकृष्ण जयंतीच्या शुभमुहूर्तावर स्वर्गीय अशोक नहार यांच्या कुटुंबीयांनी स्वखर्चातून शेवगाव-गेवराई महामार्गालगत ग्रामपंचायतीच्या कार्यालयासमोरच उभारण्यात आलेल्या ग्रामदैवत श्री. बालंबिका देवी मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या कमानीचे लोकार्पण हे ब्राह्मणांच्या हस्ते विधिवत पूजा-आर्चा करून ह.भ.प. रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांच्या शुभहस्ते. आखेगाव येथील जोग महाराज संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. राम महाराज झिंजुर्के, मारुतराव घुले, काकासाहेब नरवडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी डॉ. राम बामदळे, रामनाथ राजपुरे, रसिक नहार, मोहनराव देशमुख, विक्रम बारवकर, हनुमान पातकळ, चंद्रकांत गरड, अशोक छाजेड, रावसाहेब भाकरे, वैजनाथ सुरवसे, बाळासाहेब दोडके, भानुदास गलधर, कासमभाई शेख, अरुण बामदळे, अशोक वाघुंबरे, प्रा. महालींग डोंगरे, भाऊसाहेब बामदळे, प्रशांत देशमुख, बाबसाहेब देशमुख, सुदामराव शिंदे, गजानन देशमुख, विठ्ठल देशमुख, धनंजय देशमुख, अशोक खिळे, हरिश्चंद्र घाडगे, मधुकर पाटेकर, दत्तात्रय भिसे, भारत घोरपडे, छगनराव राजपुरे, बाबुलाल शेख, शेखर बामदळे यांच्यासह प्रवेशद्वाराच्या लोकार्पणानिमित्त मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

# शिराळ येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शिराळ चिचोंडी :** पाथर्डी तालुक्यातील शिराळ येथे ह भ प भास्करगिरी महाराज देवगड यांच्या मार्गदर्शनाखालीशिराळ येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा सुरू असूनया सोहळ्यासाठी प्रत्यक्षात १०८ भाविक पारायणासाठी बसणार होते परंतु प्रत्यक्षात १७५ भाविक यापारायणासाठी बसले आहेत हे या गावाचे वैशिष्ट्य आहे.

भौतिक सुखातत मनुष्याला अध्यात्मकाचा काहीसा विसर पडत आहे प्रत्येकाच्या जीवनात निर्माण होणाऱ्या संकटावर मात करण्याची प्रेरणा व अध्यात्मक ज्ञानाची शिकवण तसेच अठरा विविध योगा बद्दलचे ज्ञान एकमेव ज्ञानेश्वरी ग्रंथातून मिळते तेव्हा प्रत्येकाने ज्ञानेश्वरी पारायण करावे असे प्रतिपादन व्यासपीठ चालक ह भ प नारायण महाराज गायके महालक्ष्मी हिवरे यांनी केले.

यावेळी नारायण महाराज म्हणाले की अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा येथील प्रवारा नदीतील संत ज्ञानेश्वरांनी ७३६ वर्षांपूर्वी सन,१२९०मध्ये ज्ञानेश्वरी ग्रंथाचे लेखन केले यात १८अध्याय७००श्लोक आणि९११२ओव्या आहेत संत निवृत्तीनाथ महाराजमहाराज होते मराठीचे आद्य संपादक संत एकनाथ यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथ शुद्ध करून लिहिला संत महिपती महाराजांनी ज्ञानेश्वरीचे संकलन केले तर संत नामदेव यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथाचा प्रसार केलाशिराळ येथे ज्ञानेश्वरी ची पारायण करायला मिळणे आपले भाग्य आहे. शिराळ येथे निस्कामकीर्तने सेवासुरू असून महाराज एक रुपयाही दक्षिणा घेत नाही हे या सप्ताहाचं खास वैशिष्ट्य आहे.

# पारनेर तालुक्याच्या उत्तर भागात विजेचा खेळखंडोबा

## शेतकऱ्यांचे खडकवाडी सबस्टेशनवर धरणे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** पारनेर तालुक्याच्या उत्तर भागातील पळशी,वनकुटे, खडकवाडी,कामटवाडी,पोखरी,वारणवाडी,देसवडे परिसरातील शेतकरी गेल्या आठ दिवसांपासून महावितरणच्या अनियमित वीजपुरवठ्यामुळे त्रस्त झाले आहेत.गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. शेतीपिकांना पाणी देण्यासाठी वीजपुरवठा अत्यावश्यक असताना वारंवार वीज खंडित होत असल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी दि . ४ सप्टेंबर रोजी खडकवाडी येथील महावितरणच्या सबस्टेशनवर धरणे आंदोलन केले.

उत्तर भागातील वीजपुरवठ्याचा अक्षरशः खेळखंडोबा झाला आहे. पाऊस नसल्याने पिके आधीच अडचणीत आहेत. बाजरी, मूग, वाटाणा आणि कांदा वाचविण्यासाठी पाणी देणे गरजेचे आहे; मात्र कमी दाबाचा वीजपुरवठा व वारंवार खंडित होणाऱ्या विजेमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. महावितरणने तातडीने दखल घेऊन पूर्ण दाबाने वीजपुरवठा सुरळीत करावा. **संपत जाधव**

या भागातील शेतांमध्ये बाजरी, मूग, वाटाणा, कांदा यासह विविध पिके घेतलेली आहेत. पावसाअभावी ही पिके आधीच संकटात सापडली असून आता वीजपुरवठ्याच्या समस्येमुळे त्यांची अवस्था आणखी बिकट झाली आहे. पिकांना वेळेत पाणी मिळाले नाही तर हातातोंडाशी आलेले उत्पादन वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या परिसरातील वीजपुरवठा पूर्ण दाबाने होत नसल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. कमी दाबाचा वीजपुरवठा, वारंवार वीज खंडित होणे तसेच अनियमित वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शेतीसाठी पाण्याची गरज असताना वीज उपलब्ध होत नसल्याने पिकांना पाणी देणे कठीण झाले आहे.

यावेळी संपत जाधव, गणेश



शिंदे, विलास तांबे, रवींद्र गागरे, विठ्ठल सुडके, महेंद्र झावरे, संजय शिंदे, गणेश सारबंदे, अशोक शिंदे, गोविंद गागरे, शुभम गागरे, हरीओम शिंदे, सतीश शिंदे, शुभम सारबंदे, विलास सागर, बाळू आग्रे, पप्पू मोढवे, जालिंदर बारवे, विजय बिलबिले, सचिन डुकरे, आकाश बिलबिले, किशोर पिंगळे, तुकाराम बिलबिले, मच्छिंद्र शिंदे, संकेत सरोदे यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री



## वळण येथे तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील वळण येथील अक्षय बाळासाहेब देशमुख (वय ३२) या तरुणाने वळण पिंपरी गावच्या हद्दीत पिराच्या मंदिराजवळ गळफास घेऊन जीवनयात्रा संपविल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (४ सप्टेंबर) सकाळी सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास घडली. अक्षय याने हे टोकाचे पाऊल नेमक्या कोणत्या कारणातून उचलले, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नसून परिसरात विविध चर्चांना उधाण आले आहे. दरम्यान, पिंपरी गावच्या हद्दीत शेतीकाम करणाऱ्या महिलांच्या निदर्शनास ही घटना आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. अक्षय यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यासाठी सरकारी रुग्णालयात संबंधित कर्मचारी वेळेवर उपस्थित नसल्याने काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. संबंधित कर्मचाऱ्याला मागील दोन महिन्यांपासून पगार मिळाला नसल्याने तो कामावर येत नसल्याचे कारण सांगण्यात आल्याने मृताच्या नातेवाईकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली. त्यामुळे रुग्णालय परिसरातील वातावरण काही काळ तापले होते. अक्षय देशमुख यांच्या पश्चात आई, वडील, एक भाऊ, चुलते असा परिवार आहे.

## कर्ज घेतले दुचाकीचे मात्र नावावर पडले ऑटो लोन; शेतकऱ्याचा आरोप




### नेमका वाद काय?

- दुचाकी कर्ज असल्याचा ग्राहकाचा स्वीकार
- क्रेडिट रिपोर्टमध्ये ५.५० लाखांचे ऑटो लोन दिसल्याचा दावा
- संबंधित ऑटो कर्ज घेतले नसल्याचा शेतकऱ्याचा आरोप
- कंपनीकडून तांत्रिक/मॅपिंग त्रुटी झाल्याचे स्पष्टीकरण
- चुकीची नोंद हटविण्यासाठी प्रक्रिया सुरू असल्याचा दावा
- शेतकऱ्याकडून सखोल चौकशी व दोषींवर कारवाईची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : दुचाकीसाठी घेतलेल्या कर्जाचे नियमित हप्ते भरत असतानाच एका शेतकऱ्याच्या क्रेडिट रिपोर्टमध्ये तब्बल ५ लाख ५० हजार रुपयांचे ऑटो लोन दिसून आल्याने खळबळ उडाली आहे. आपण असे कोणतेही ऑटो कर्ज घेतले नसताना आपल्या नावावर ही नोंद कशी झाली, असा संतप्त सवाल उपस्थित करत शेतकरी संकेत रंगनाथ बिबे यांनी संबंधितांवर गंभीर आरोप केले आहेत.

या प्रकरणात कागदपत्रांचा गैरवापर करून आपल्या नावाने कर्जप्रकरण तयार करण्यात आल्याचा आरोप बिबे यांनी केला असून, या संपूर्ण व्यवहाराची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या आरोपांवर संबंधित फायनान्स कंपनीने वेगळे स्पष्टीकरण दिले आहे. संकेत बिबे यांच्या नावावर केवळ दुचाकीचे कर्ज खाते असून, क्रेडिट रिपोर्टमध्ये दिसत असलेले सुमारे ५.५० लाख रुपयांचे ऑटो लोन हे तांत्रिक अथवा मॅपिंगमधील त्रुटीमुळे चुकीचे प्रतिबिंबित झाल्याचे कंपनीकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

चुकीची नोंद हटविण्यासाठी क्रेडिट ब्युरोकडे आवश्यक प्रक्रिया सुरू असल्याचेही कंपनीने नमूद केले आहे. मात्र, कंपनीच्या या स्पष्टीकरणानंतरही प्रश्न कायम आहे–शेतकऱ्याच्या क्रेडिट रिपोर्टमध्ये साडेपाच लाख रुपयांचे कर्ज आले तरी ते केवळ 'तांत्रिक त्रुटी' म्हणून मिटवायचे का? या प्रकरणामुळे क्रेडिट रिपोर्टमधील माहितीची अचूकता, ग्राहकांच्या आर्थिक ओळखीची सुरक्षितता आणि कर्जप्रकरणातील कागदपत्रांची पडताळणी या मुद्द्यांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

आता या कथित कर्जनोंदीमागे नेमकी तांत्रिक चूक आहे की आर्थिक गैरप्रकार, याचा उलगडा चौकशीतून होणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## राशीन शहरात मराठा आरक्षणासाठी कडकडीत बंद






**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राशीन** : मराठा आरक्षणासह विविध न्याय्य मागण्यांसाठी संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या सुरू असलेल्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाज कर्जत तालुक्याच्या वतीने शनिवारी, दि. ५ सप्टेंबर रोजी राशीन शहरात सकाळपासून दिवसभर कडकडीत बंद पाळण्यात आला.

मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची शासनाने गांभीर्याने दखल घेऊन मराठा आरक्षणासह समाजाच्या प्रलंबित मागण्यांवर तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. व्यापारी, व्यावसायिक व नागरिकांनी बंदला प्रतिसाद देत आपली आस्थापने बंद ठेवून आंदोलनाला पाठिंबा दर्शविला.

सकल मराठा समाज कर्जत तालुका यांच्यावतीने शिवश्री रावसाहेब महादेव धांडे (प्रमुख समन्वयक) यांनी शासनाने केवळ आश्वासने न देता मराठा समाजाच्या मागण्यांवर ठोस निर्णय घ्यावा, अशी भूमिका मांडली.

## कत्तलीसाठी बांधलेल्या १३ गोवंश जनावरांची सुटका

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : कत्तलीच्या उद्देशाने गोवंश जनावरांना दाटीवाटीने बांधून ठेवल्याचा आरोप करत वैजापूर पोलिसांनी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शनिवार रोजी सायंकाळी ४.३० वाजेच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.या कारवाईत पोलिसांनी एकूण १३ गोवंश जनावरे ताब्यात घेतली असून, त्यांची अंदाजे किंमत २ लाख ८ हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षक रामेश्वर ढाकणे यांनी फिर्याद दिली आहे.त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ५ सप्टेंबर २०२६ रोजी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाने पोलीस पथक अवैध धंद्याबाबत माहिती घेऊन कारवाईसाठी निघाले होते. यावेळी मिळालेल्या माहितीनुसार, खंडाळा गावातील बोरसरकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या गट क्रमांक १२७ मध्ये काही जणांनी गोवंश जनावरे कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, १३ जिवंत गोवंशीय जनावरे दाटीवाटीने दोरीने बांधून ठेवल्याचे आढळून आले.जनावरांना चारापाणी न देता कत्तलीच्या उद्देशाने क्रूरपणे बांधून ठेवल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कारवाईदरम्यान पोलिसांनी चौकशी केली असता ही जनावरे समीर रऊफ कुरेशी व शहाबाज रऊफ कुरेशी, दोघे रा. खंडाळा, ता. वैजापूर यांची असल्याचद कळाले. पोलिसांनी दोघांनाही बोलावून घेऊन दाखला बाबत विचारणा केली व जनावरे कशासाठी आणली याची विचारणा केली याबाबत पोलिसांना उडवाउडीची उत्तरे मिळाली.प्रकरणात पोलिसांनी १३ जनावरे ताब्यात घेतली. या प्रकरणी दोन्ही संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## सहा वर्षे पोलिसांना चकवा देणारा आरोपी लखमापुरीत जेरबंद



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी शहर** : गुन्हा दाखल झाल्यानंतर तब्बल सहा वर्षे पोलिसांना चकवा देत पसार असलेल्या आरोपीला अखेर पाथर्डी पोलिसांनी मोठ्या शिताफीने लखमापुरी परिसरातून जेरबंद केले. पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कारवाईमुळे प्रलंबित असलेल्या गुन्ह्याच्या तपासाला महत्त्वाची दिशा मिळाली आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, भागवत गणपत चार (वय ५०, रा. सोनोशी, ता. पाथर्डी) यांनी २२ डिसेंबर २०१९ रोजी काही इसमांच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली होती.

याप्रकरणी त्यांच्या पत्नीने दिलेल्या तक्रारीवरून पाथर्डी पोलीस ठाण्यात ६ जानेवारी २०२० रोजी भारतीय दंड संहिता कलम ३०६, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील आरोपी भगवान चंद्रभान निर्मळ (वय ४२, रा. लखमापुरी, ता. शेवगाव) हा फरार झाला होता. पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी पोलीस उपनिरीक्षक संदिप मुरकुटे आणि पोलीस कर्मचारी अक्षय वडते यांना आरोपीचा शोध घेऊन पुढील कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. दरम्यान, आरोपी लखमापुरी गावात आल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. दक्षिण मोबाईल सेल, अहिल्यानगर येथील पोलीस कर्मचाऱ्यांची तांत्रिक मदत घेत आरोपीचा लखमापुरी परिसरात शोध शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक संदिप मुरकुटे, पोलीस कर्मचारी अक्षय वडते, दक्षिण मोबाईल सेलचे अरुण सांगळे आणि राहुल गुंडु यांनी परिश्रम घेतले.

## सकल मराठा समाजाच्यावतीने शनिवारी कर्जत बंद



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : मराठा आरक्षणासह विविध मागण्यांसाठी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या अंतरवली सराटी येथील आंदोलनास कर्जत सकल मराठा समाजाने पाठींबा दर्शवत शनिवारी कर्जत बंदची हाक दिली होती. यावेळी कडकडीत बंद पाळत नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शनिवार (दि.५) अत्यावश्यक सेवा वगळता कर्जत बंद होते. अंतरवली सराटी येथे मराठा आरक्षणासह विविध मागण्यांसाठी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी शनिवार (दि.५) कर्जत शहरात सकल मराठा समाजाच्यावतीने बंद पाळण्यात आला.

मराठा समाजाच्यावतीने केलेल्या आवाहनास व्यापारी बांधवांनी सकारात्मक प्रतिसाद देत आपले व्यवहार कडकडीत बंद ठेवले होते. सकाळी १० वाजता शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात अनेक बांधवांनी आपल्या तीव्र भावना स्थानिक तालुका प्रशासनासमोर मांडत सरकारला आंदोलन तीव्र करण्याचा इशारा दिला. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी अनेक उपोषण करीत सरकारचे लक्ष वेधले. मात्र दरवेळी समाज बांधवांची सरकार फसवणूक करीत आहे. आरक्षण संबंधी वेळकाढूपणा करीत तमाम गरजवंत मराठा बांधवांना वेठीस धरले जात असल्याचे मान्यवरांनी आपल्या भाषणात मांडले.

शासनाने जरांगे पाटील यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास आगामी काळात आंदोलनाची धार अधिक तीव्र केली जाईल असा इशारा देण्यात आला. शासनाने मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची गांभीर्याने दखल घेत मराठा समाजाच्या न्यायीक मागण्यांवर तात्काळ सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केली.

## सोनई परिसरात गौण खनिज तस्करीला ऊत

### कोट्यवधींची उलाढाल?

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : नेवासा तालुक्यातील सोनई परिसरात मुरूम या गौण खनिजाची अवैध वाहतूक पुन्हा जोरात सुरू झाल्याची चर्चा परिसरात आहे. दिवस-रात्र सुरू असलेल्या या वाहतुकीमुळे शासनाच्या महसुलाचे मोठे नुकसान होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे महसूल व पोलिस प्रशासनाच्या नजरेसमोरून ही वाहतूक सुरू असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

काही दिवसांपूर्वी बंद असलेली मुरूम वाहतूक अचानक पुन्हा सुरू झाली असून, विनाक्रमांकाचे डंपर, दोन ट्रॉलीचे ट्रॅक्टर आदी वाहनांचा वापर होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शासनाची रॉयल्टी न भरता मुरूमाची वाहतूक केली जात असल्याने संबंधितांवर महसूल प्रशासन, पोलिस व परिवहन विभागाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. या प्रकाराबाबत यापूर्वी वृत्तपत्रे तसेच सोशल मीडियातून आवाज उठविण्यात आला आहे. मात्र, अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याने मुरूम तस्करांचे मनोबल वाढल्याची चर्चा आहे. परिसरातील विविध ठिकाणी मुरूमाचे साठे व वाहतूक सुरू असल्याचेही नागरिक सांगत आहेत. महसूल विभागाने तातडीने विशेष पथकाच्या माध्यमातून तपासणी करून अवैध उत्खनन व वाहतुकीवर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## अनिल वाळके महाराजांचा राष्ट्रीय संत घोषीत



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी** : वारकरी संप्रदायाचे जेष्ठ उपासक, अनिल वाळके महाराज यांचे वारकरी संप्रदायासह धार्मिक कार्यातील योगदान पाहता आगामी कुंभमेळा महापर्वादरम्यान शंकराचार्य, विविध संत महंत, तपस्वी, सिद्धयोगी आदींच्या उपस्थितीत राष्ट्रीय संत या पदावर नियुक्ती बद्दल सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती या सोहळ्याचे मार्गदर्शक नामदेव महाराज हरड यांनी दिली.

बाबूजी आव्हाड महाविद्यालयामध्ये आयोजित पत्रकार परिषदेमध्ये या निवडीची घोषणा करण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष अभय आव्हाड, मराठा महासंघाचे अध्यक्ष संभाजी दहातोंडे, अशोक ताठे, रमेश घोडके आदी उपस्थित होते. अनिल वाळके महाराज गेले अनेक वर्षंपासून वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून राज्यभर सेवा कार्य करीत आहेत. पुढील वर्षी नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी जगभरातून साधुसंत, महंत, आखाडा प्रमुख उपस्थित राहणार आहेत. गेल्या ४० वर्षांपासून वाळके महाराजांची सांप्रदायाची सेवा सुरू आहे.

कुंभमेळ्यातील सर्वात मोठ्या व्यासपीठावर हा सन्मान सोहळा संपन्न होणार आहे. यावेळी वाळके महाराज म्हणाले, या नियुक्तीने संपूर्ण तालुक्याचा सन्मान झाला आहे. धर्मप्रचार व प्रसारासाठी आपण प्रामाणिकपणे मनापासून प्रयत्न करू असे सांगितले.

## एलसीबीच्या कारवाईने गुटखा माफियांचे धाबे दणाणले

### चोरी चोरी चुपके चुपके गुटका, मावा मिळतो पण दुप्पट दराने

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने जिल्ह्यात अवैध गुटखा-मावा विक्रेत्यांविरोधात सुरू केलेल्या धडक मोहिमेने तालुक्यातील अवैध व्यवसायिकांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत. कारवाईच्या धास्तीने अनेक विक्रेत्यांनी गुटखा-मावा विक्रीबाबत सावध भूमिका घेतली असून काही ठिकाणी माल लपविण्याची धावपळ सुरू आहे.

विशेष म्हणजे, कारवाईनंतरही तालुक्यात गुटखा-मावा पूर्णतः गायब झालेला नाही. माल मिळत आहे; मात्र त्याच्या किंमतीत लक्षणीय वाढ झाल्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे.

कारवाईच्या भीतीमुळे पुरवठा साखळीवर परिणाम झाल्याने उपलब्ध मालासाठी जादा दर आकारले जात असल्याची चर्चा आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईमुळे अवैध व्यवसायिकांमध्ये एकीकडे भीतीचे वातावरण निर्माण झाले असले, तरी दुसरीकडे वाढलेल्या दरांचा फायदा घेण्यासाठी काही जणांकडून 'संधीचा बाजार' मांडला जात असल्याचेही बोलले जात आहे.

कारवाईचा धसका, पण व्यवसाय सुरूच; फक्त दर वाढले! अशी परिस्थिती सध्या तालुक्यात दिसत असून, प्रशासनाच्या पुढील कारवाईकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

केवळ मोठ्या कारवाया करून न थांबता, किरकोळ विक्रेत्यांपासून पुरवठादार आणि या अवैध साखळीच्या सूत्रधारांपर्यंत पोहोचल्यासच गुटखा-मावा व्यवसायाला खऱ्या अर्थाने आळा बसेल, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

कारवाईचा धक्का बसला आहे, हे स्पष्ट आहे; मात्र प्रश्न अजूनही कायम आहे गुटखा बंद झाला की फक्त महाग झाला? त्यामुळे पोलिसांना आता थेट पुरवठादारांवरच कारवाईचा बडगा उगारावा लागणार आहे. तरच या कारवाईतून गुटखा मावा बंदी वर कायमस्वरूपी तोडगा निघत अशी नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे.

## अकोले श्रीगोंद्यात एकाच वेळी दहा ठिकाणी पोलिसांचे छापे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : जिल्ह्यात अवैध गुटखा, मावा आणि सुगंधित तंबाखूच्या विक्रीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने जोरदार कारवाई करत अकोले, राजूर, कर्जत, श्रीरामपूर आणि श्रीगोंदा परिसरात एकाचवेळी तब्बल १० ठिकाणी छापे टाकले. या धडक मोहिमेत २० आरोपींविरुद्ध १० स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून, २ लाख ७६ हजार ८९६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने विशेष मोहीम हाती घेतली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली पाच स्वतंत्र पथके तयार करण्यात आली होती. या पथकांनी ४ आणि ५ सप्टेंबर रोजी गुप्त माहितीच्या आधारे अकोले, राजूर, कर्जत, श्रीरामपूर शहर तसेच श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत छापेमारी केली. सुगंधित तंबाखू, मावा आणि गुटखा तयार करून त्याची अवैध विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली.

श्रीगोंद्यात दोन ठिकाणी कारवाई; ८७ हजारांहून अधिकचा मुद्देमाल श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन स्वतंत्र कारवाया करण्यात आल्या. टाकळी कडेवळीत येथील सतीष शिवाजी खामकर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून १४ हजार १०४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणात राशीन येथील एका फरार व्यक्तीचाही सहभाग असल्याचा आरोप आहे. दुसऱ्या कारवाईत देऊळगाव येथील महेश सर्जेराव गलांडे आणि श्रीगोंदा येथील शोएब राजू तांबोळी यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. या कारवाईत ७३ हजार २८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या प्रकरणातील आणखी एक आरोपी फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### जिल्हाभर एकाचवेळी 'गुटखा क्लीनअप'

या विशेष मोहिमेत श्रीरामपूर शहरात सर्वाधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, एका कारवाईत ८५ हजार ३०० रुपयांचा माल हस्तगत करण्यात आला. अकोले, राजूर आणि कर्जत परिसरातही विविध ठिकाणी छापे टाकून अवैध गुटखा-मावा विक्री करणाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले.

सर्व प्रकरणांमध्ये भारतीय न्याय संहितेतील कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच काही प्रकरणांत कलम ३(५) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांनी ही संयुक्त धडक कारवाई केली. जिल्ह्यात गुटखा-मावा विक्रीचा अवैध व्यवसाय अजूनही विविध मार्गांनी सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेच्या या '१० छाप्यांच्या ऑपरेशन'ने अवैध विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. मात्र, प्रश्न एवढाच या कारवाईनंतर अवैध गुटख्याची साखळी खरोखर तुटणार की काही दिवसांत पुन्हा 'मावा मार्केट' पूर्ववत होणार?

### दुसऱ्या दिवशी पुन्हा काष्टी कारवाई

श्रीगोंदा तालुक्यातील अनेक ठिकाणी गुटख्यावर छापा मारून लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्यानंतर सलग दुसऱ्या दिवशी ही स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने काष्टीत कारवाई करत मोठ्या प्रमाणात गुटखा जप्त केल्याची माहिती मिळत आहे त्यामुळे आता गुटखा चालकांना वैद्य चालकांकडून कोणत्याही प्रकारची संधी दिली जात नसल्याचे खुलेआम बोलले जात आहे.

## उपोषणकर्ते प्रल्हाद कीर्तने यांची प्रकृती खालावली

### प्रशासनाच्या भूमिकेविरोधात ओबीसी समाजाचा संताप; तीव्र आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी** : ओबीसी आरक्षणाच्या बचावासह विविध मागण्यांसाठी किर्तनवाडी येथे उपोषणाला बसलेले प्रल्हाद कीर्तने यांची प्रकृती खालावल्याने प्रशासनाच्या भूमिकेविरोधात ओबीसी समाजात संताप व्यक्त होत आहे. उपोषणकर्त्यांची प्रकृती बिघडत असतानाही प्रशासनाकडून अपेक्षित गांभीर्य दाखवले जात नसल्याचा आरोप ग्रामस्थ व आंदोलकांनी केला आहे. प्रल्हाद कीर्तने यांच्या प्रकृतीची पाहणी करून त्यांच्या मागण्यांबाबत चर्चा करणे अपेक्षित असताना तहसीलदारांनी उपोषणस्थळाकडे पाठ फिरवल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला.




प्रशासनाच्या कथित उदासीनतेमुळे आंदोलकांमध्ये नाराजी वाढली असून, उपोषणकर्त्याच्या आरोग्याची तातडीने वैद्यकीय तपासणी करून आवश्यक उपचारांची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, मंत्री छगन भुजबळ यांनी प्रल्हाद कीर्तने यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. त्यामुळे या उपोषणाला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

प्रशासनाने तातडीने मागण्यांवर सकारात्मक चर्चा न केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा ओबीसी समाजाच्या कार्यकर्त्यांनी दिला आहे. दरम्यान, समता परिषदेचे पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ तसेच ओबीसी समाजातील हजारो कार्यकर्त्यांनी उपोषणस्थळी उपस्थित राहून कीर्तने यांना ठाम पाठिंबा दिला. प्रशासन आता कोणती भूमिका घेते, याकडे परिसराचे लक्ष लागले आहे.